# प्रकरण पहिले

# " प्रास्ताविक आणि भूमिका "

पृष्ठ क्रमांक १ ते ३८

# प्रकरण पहिले
# - प्रास्ताविक आणि भूमिका -

महाराष्ट्राची माती ही अशी अभिमानी आहे की, तिच्या कुशीत कर्मयोगी व धर्मयोगी केव्हा जीवनयोगी बनून जातो त्याचे त्यालाच कळत नाही. अशी ही भूमी शूरांची, विरांची, विचारवंतांची, साहित्यिकांची, शास्त्रज्ञ-तत्वज्ञांची खाण आहे. महाराष्ट्राला थोर प्राचिन परंपरा लाभलेली आहे. संत, पंत, तंत यांच्या सहवासामुळे ही भूमी पावन झालेली आहे. कर्तृत्त्ववान महापुरूषांमुळे ती समृद्ध आणि वैभव संपन्न झाली आहे. याच पवित्र भूमीत यशवंतरावांसारखे अतिशय बुध्दिमान, विचारी, संवेदनशील व्यक्तिमत्व जन्माला आले.

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, महाराष्ट्राचे कुलदैवत मा. स्व. यशवंतरावजी चव्हाण म्हणजे कर्तबगारीचा सागर, पावित्र्याचा आगर, निर्भयतेचा महामेरू, चैतन्याचा महासिंधूच होय. महाराष्ट्राच्याच नव्हे तर देशाच्याही राजकारणात आपले वेगळेपण सांभाळून त्यांनी आदर्श चारित्र्याने हिमालयाचे कर्तृत्व दाखविले. आदर्श चारित्र्य व शील असणारे, विरोधकांनाही आपलेसे वाटणारे भारताचे माजी उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाण हे व्यासंगी राजकारणी होते. राजकारणातून समाजपरिवर्तन करू पाहणारे ध्येयवादी वृत्तीचे यशवंतराव स्वबळावर, स्वकर्तृत्वावर आणि स्वयंप्रेरणेने असामान्यपदी पोहचले. ज्ञानपिपासू वृत्तीने ज्ञानाची उपासना करून त्याचा उपयोग समाजकारणात त्यांनी केला. मानवतेची जोपासना करणारे, निसर्गवेडे यशवंतराव हे सामान्यातील असामान्य होते. साहित्याचा पिंड असणारे हे साहित्यिक अतिशय संवेदनशील पण तितकेच संयमी वृत्तीचे होते. वयाने, ज्ञानाने, पैशाने कितीतरी माणसे मोठी होतात परंतु मनाने मोठे असणारे यशवंतराव स्वत:बरोबरच दुसऱ्यांनाही मोठे करण्यात आनंद मानत. असा हा लोकनेता हा राजनेता केव्हा आणि कसा बनला हे समजून घेण्याच्या भूमिकेतून अभ्यास करणे मला गरजेचे वाटते.

यशवंतराव हा एक 'विचार' होता 'आचार' होता. ते उत्तम साहित्यिक होते, रसिक होते आणि समीक्षकही होते. वक्तृत्वाचे शिवाजी होते. त्यांचा मूळ पिंड प्रतिभावंत विचारवंताच होता. त्यांच्या शब्दाशब्दांतून मनाला स्फूर्ती प्रेरणा मिळते. वाङ्मयीन सौंदर्याने नटलेले त्यांचे साहित्य हे साहित्यरसिकांचा अनमोल ठेवा आहे. साहित्य आणि

समाजजीवन यांचा परस्परसंबंध मानणारे यशवंतराव साहित्यातून सामाजिक बांधिलकी जोपासतात. त्यांनी सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, साहित्यिक, धार्मिक, नैतिक इ.सर्व विषयांवर अतिशय मार्मिकपणे आपल्या भाषणांतून विचार मांडले आहेत. यशवंतरावांचा प्रगाढ अभ्यास, वाचन यातून आलेली प्रगल्भता या गुणांमुळे बनलेले सर्व गुणसंपन्न व्यक्तिमत्त्व याची खोलवर वैचारिक ओळख करणे महत्त्वाचे वाटते. त्यांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि साहित्यिक विषयांवरील भाषणातून व्यक्त होणारा विचार निश्चितच आजच्या पिढीला मार्गदर्शक ठरेल या भूमिकेतून अभ्यास करणे महत्वाचे वाटते.

यशवंतरावांचा पिंड हा साहित्यिक होता. साहित्याची आवड, साहित्यनिर्मिती करणे, साहित्यसंमेलनास उपस्थित राहणे यातून त्यांचे साहित्यावरील प्रेम आंतरिक उमाळ्याचे असल्याचे लक्षात येते. त्याचमुळे यशवंतरावांच्या निवडक साहित्यकृतींचा अभ्यासपूर्ण आस्वाद घेणे हा प्रस्तुत संशोधनाचा हेतू आहे. यामध्ये सह्याद्रीचे वारे, विचारधारा, युगांतर आणि भूमिका या ग्रंथामधील भाषणांतून जाणवलेली वाङ्मयीन मूल्ये शोधणे गरजेचे वाटते. यातूनच यशवंतरावांचे अभ्यासपूर्ण व्यक्तिमत्व आजच्या पिढीसमोर आणण्याच्या प्रयत्नातून अभ्यास करावा वाटतो.

महाराष्ट्राचा अभिमान म्हणून ज्यांच्याकडे आपण पाहतो ते यशवंतराव अतिशय संयमशील, मुत्सद्दी आणि सहिष्णू वृत्तीचे होते. जीवनाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टीकोन, त्यांची वैचारिक प्रगल्भता आणि त्यातून जाणवणारी जीवननिष्ठा, त्यांच्या समग्र वाचनानंतर लक्षात येते. आपुलकी, माणुसकी, जिव्हाळा, स्नेह या गुणांतून अंकुरलेले हे व्यक्तिमत्त्व मानवतेने ओथंबलेले होते. मराठी मातीत जन्माला आलेले, त्याच मातीत वाढलेले आणि त्यालाच सुगंध वाहण्यात धन्यता मानणारे यशवंतराव, सामान्य माणसाच्या हृदय सिंहासनावर आरूढ झाले. स्वत:च्या हिमालयाएवढ्या कर्तृत्वाने महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री, केंद्रिय मंत्रीमंडळात गृहमंत्री, अर्थमंत्री, परराष्ट्र मंत्री आणि उपपंतप्रधान पदापर्यंत पोहचू शकलेले. अशा महान व्यक्तीमत्त्वाचा आदर्श नव्याने मांडण्याची गरज लक्षात घेऊन त्यांच्यावर अभ्यास करणे हा संशोधनाचा मूळ हेतू आहे.

'आपला देश' हीच माता मानणारे देशप्रेमी यशवंतराव उत्तम राजकारणी वृत्तीचे होते. राजकारणाच्या आधारावर समाज सुधारणा करणारे समाजसुधारकही होते. मराठी माती, मराठी माणसं आणि मराठी भाषेवर मनापासून प्रेम करणारे मराठमोळे यशवंतराव

खऱ्या अर्थाने आदर्श व्यक्तिमत्व ठरले. जनसामान्यांच्या भावना, सुख-दु:खे, समस्या समजून घेऊन त्यावरती उपाययोजना करणारे धुरंधर राजकारणी होते. त्यांचे अवघे जीवन फुलासारखे सुगंधित होते. कर्तृत्वाचा गंध आसमंतास गंधित करतो, चैतन्य देतो असा गंध उधळणारे यशवंत, जयवंत, कीर्तिवंत, गुणवंत, ज्ञानवंत, शीलवंत, पुण्यवंत, वरदवंत व्यक्तिमत्व म्हणजे यशवंतराव. जनतेचे कल्याण हेच देशाचे कल्याण या भूमिकेशी ठाम असणारे यशवंतराव सामाजिक उभारणी करण्यासाठी प्रयत्नशील राहिले. सामाजिक विषमता, आर्थिक विषमता, अज्ञान, अंधश्रद्धा, शिक्षण, स्त्री-शिक्षण, आरोग्य या विषयांवर सखोल वाचन, मनन, चिंतन करून योग्य दिशा देण्याचा त्यांनी अखंड प्रयत्न केला. त्यांचे हे 'विचारधन' समाजापर्यंत पोहचविण्याचा संशोधकाचा मानस आहे.

'वक्ता दशसहेस्त्रू' या उक्तीप्रमाणे यशवंतरावांनी अमोघ वक्तृत्वातून आपला प्रभावी भाषणाचा पिंड तयार केलेला होता. यशवंतरावांची भाषणे म्हणजे छोटे-छोटे लघुनिंबधच होय. 'सह्याद्रीचे वारे', 'युगांतर', 'विचारधारा' आणि 'भूमिका' या चार भाषणसंग्रहातुन आलेले विचारधन समाजास निश्चित उपयुक्त ठरणारे आहे. त्यांच्या शब्दाशब्दांतून वाङ्मयीन सौंदर्य जाणवते. प्रतिभेची जोड आणि विचारांची प्रगल्भता लाभलेल्या भाषणांतून एक 'विचार' समाजास मिळावा आणि नवनिर्मित समाजाचे यशवंतरावांचे स्वप्न पूर्ण व्हावे या दृष्टीकोनातून त्यांच्या भाषणांचा अभ्यास करणे महत्वाचे वाटते. यशवंतराव राजकारणात पडले नसते तर ते उत्तम साहित्यिक झाले असते. त्यांचे साहित्य शालीनतेनं नटलेले, वाङ:मयीन मूल्यांनी चिंब भिजलेले, मनाला मोहवून टाकणारे आणि वैचारिक दिशा देणारे आहे. ही वैचारिक बिजे समाजात रूजविण्याचा हा एक माफक प्रयत्न आहे. त्याच बरोबर वाङ्मयीन झालर प्राप्त झालेल्या त्यांच्या साहित्यातून वाङ्मयीन मूल्यांचा अभ्यास करणे प्रस्तुत संशोधकाचा हेतू आहे.

आजच्या राजकारणी व्यक्तींना मार्गदर्शक ठरणारे यशवंतरावांचे विचार हे खऱ्या अर्थाने अमृतरूपी आहेत. लोकशाहीमध्ये जनतेच्या कल्याणासाठी सत्तेचा वापर करावा हा विचार आजच्या राजकारणातून लोप पावलेला दिसतो आहे. मानवी मूल्यांना तिलांजली मिळालेल्या आजच्या राजकारणी लोकांची राजकारणाचा स्वार्थापोटी वापर करण्याची वृत्ती बळावलेली आहे. भ्रष्टाचार, महागाई, अन्याय, अत्याचार, दारिद्र्य, अज्ञान, लोकसंख्यावाढ, प्रदुषण या समस्यांच्या दलदलीत संपूर्ण समाज पिचलेला आहे. घोषणा फक्त देण्यापुरत्याच असतात. प्रत्यक्षात त्यांची अंमलबजावणी होतच नाही. या

सर्व बाबींमुळे देशाची प्रगती अतिशय मंद गतीने होत आहे. अशा परिस्थितीत यशवंतरावांसारख्या कर्तृत्ववान नेत्याची देशाला आज गरज आहे. प्रस्तुत संशोधकाच्या संशोधनातून आलेले यशवंतरावांचे आर्थिक सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक या विषयांतील निवडक विचार आजच्या पिढीतील नवतरूणांना दिशा दाखविणारे ठरतील आणि त्या विचारांची स्फूर्ती घेऊन यशवंतरावांसारखा विचारी युवक निर्माण होईल या आशेने त्यांच्या निवडक भाषणांतून आलेल्या अनमोल विचारांचा सखोल अभ्यास करणे आणि त्यातून वाङ:मयीन मूल्यांचा शोध घेणे हा प्रस्तुत संशोधकाचा हेतू आहे.

यशवंतरावाचे आजोळ अन् जन्मगाव देवराष्ट्रे हे प्रस्तुत संशोधकाचेही जन्मगाव असल्यामुळे त्यांच्या व्यक्मिमत्वाचा प्रभाव, काही प्रसंग लहानपणीच्या आठवणी, देवराष्ट्रेतील त्यांचे वास्तव्य या साऱ्या घटना लेखिकेच्या कानावर पडत गेल्या. पुढे-पुढे तर या महान व्यक्तिमत्वाचा जन्म आपल्याच गावी झालेला असल्याचा प्रचंड अभिमान मनास वाटू लागला. त्यांच्या दर्शनाची ओढ वाटू लागली, त्यांच्या कर्तृत्वाविषयी आदर वाटू लागला आणि कळत नकळत त्यांच्या प्रभावी व्यक्तित्वा विषयी जबरदस्त कुतूहल वाटू लागले. त्यातूनच त्यांच्या साहित्य वाचनाची आवड निर्माण झाली आणि या महान नेत्याविषयी, त्यांच्या मोठेपणाविषयी, विचारांविषयी सखोल अभ्यास करावा असे संशोधकाला वाटू लागले. याच प्रेरणेतून संशोधकाने हा विषय हाती घेतला आहे.

यशवंतरावांना जाऊन आज १९ वर्षे झाली तरीही मनामनात त्यांचे स्थान अजून कायम राहिलेले आहे. त्यांच्या विचारांचा अनमोल ठेवा आजही जपला गेला आहे. त्यांच्या अमोघ वक्तृत्वाबद्दल आजही मोठया अभिमानाने बोलले जाते. प्रस्तुत संशोधकाला अगदी लहानपणी फक्त एकदाच त्यांना पाहण्याची संधी लाभली ती आठवण आजही मनास तजेला देणारी आहे. कार्यक्रमाच्या निमित्ताने केलेल्या भाषणाचे शब्द मनास मोहिनी घालणारे वाटले. यातून त्यांच्या भाषणांचा अभ्यास करावा असे वाटू लागले. त्यांच्या 'सह्याद्रीचे वारे', 'युगांतर' आणि 'भूमिका' या पुस्तकांमधील काही निवडक भाषणांचा अभ्यास करण्याचा मानस केला. त्यांची भाषणे अतिशय विनम्र भाषेत, वैचारिकतेच्या पायावर उभी असणारी पण माणुसकीने ओथंबलेली असत. लोकांना ते आपल्यातीलच एक आहेत असे वाटे. जनतेच्या समस्यांविषयी अतिशय जिव्हाळ्याने ते बोलत असत. अशा थोर माणसाच्या भाषणातील विचार आज

समाजापर्यंत पोहोचविण्याच्या दृढ इच्छेतून संशोधकाची भूमिका निश्चित होत गेली आणि त्याचा अभ्यास करण्याची इच्छा निर्माण झाली.

आजच्या दिशाहीन समाजामध्ये, युवकांमध्ये अतिशय वैफल्याची अवस्था निर्माण झालेली आहे. जीवनामध्ये नैराश्य आले असताना नेमका आदर्श कोणाचा हे समजेनासे झालेले आहे. अशा परिस्थितीत यशवंतरावांच्या सारखा आदर्श समोर ठेवला तर निश्तिच जीवनाची वाटचाल यशस्विपणे पार पडेल. म्हणूनच या महान पुरूषाची जीवन ज्योत इतरांना मार्ग दाखविणारी ठरते. अतिशय सुसंस्कारित व्यक्तिमत्व असलेले यशवंतराव चारित्र्यसंपन्न, कर्तव्यनिष्ठ, वृत्तीचे होते. त्यांची जीवनाकडे पाहण्याची दृष्टी अतिशय मानवतावादी स्वरूपाची होती. वैचारिक प्रगल्भता लाभलेल्या या महान पुरूषाने नेहमी लोककल्याणाचा विचार केला. सामाजिक बांधिलकी जोपासणाऱ्या या नेत्याने नेहमी समाजाचे हित, राज्याचे हित, मानवाचे हित आणि यातूनच देशाचे हित साधण्याचा प्रयत्न केला. समाज प्रबोधनातून सामाजिक एकात्मता, समानता, बंधुता, आर्थिक विषमता, शिक्षणाची आवश्यकता, अस्पृश्यता, आरोग्य, संस्कृती संवर्धन, कृषी- औद्योगिक क्षेत्र आणि समाजवादी समाजरचना इ. विषयांवरील त्याची विचारसरणी अतिशय दिशादर्शक आहे. त्यांचे हे अनमोल 'विचारधन' समाजाला निश्चितच मार्गदर्शक ठरेल अशी भूमिका संशोधकाची आहे.

यशवंतराव एक नामवंत साहित्यिक होते. त्यांनी अतिशय दर्जेदार साहित्यांची निर्मिती केलेली आहे. त्यांच्या समग्र साहित्य वाचनानंतर, त्यांचे हे विचार आजच्या काळात अत्यावश्यक असल्याचे लक्षात येते. समाज आणि साहित्य यांचा परस्पर संबंध असल्याचे त्यांनी ओळखून साहित्यांतून समाजनिर्मिती करण्याचा प्रयत्न केला. अतिशय अभ्यासू, ज्ञानपिपासू असणारे वैचारिक व्यक्तिमत्व लाभलेले हे साहित्यिक साहित्याविषयी काही मार्गदर्शक विचार मांडतात. 'समाज' हा महत्वाचा असल्याचे प्रतिपादन करताना सामाजिकतेतून सर्वांगिण विकास करण्याचे स्वप्न ते मनी बाळगतात. साहित्यातून समाज जीवनाचा वेध घ्यावा आणि त्यातील विविध अंगांवर प्रकाश टाकावा असे त्यांना वाटते. साहित्यिकांनी राष्ट्रीय ऐक्यासाठी प्रयत्नशील रहावे. राष्ट्रीय जीवनाशी एकरूप व्हावे अशी आशा ते बाळगतात.

साहित्यावर आणि साहित्यिकांवर प्रेम करणाऱ्या यशवंतरावांनी समग्र साहित्यनिर्मिती केली. अतिशय प्रतिभावंताची दृष्टी लाभलेल्या या लेखकाने साहित्यातून समाजदृष्टी निर्माण करण्याचा प्रयत्न केला. 'कृष्णाकाठ', 'ऋणानुबंध',

'विदेश दर्शन', 'शिवनेरीच्या नौबती', 'सह्याद्रीचे वारे', 'युगांतर', 'भूमिका', अशी दर्जेदार साहित्य निर्मिती त्यांनी केली. यामध्ये 'सह्याद्रीचे वारे', 'युगांतर' आणि 'भूमिका' या भाषण संग्रहातील भाषणे ही अतिशय उत्कृष्ठ आहेत. जनसामान्यांच्या भावभावना, आशा-आकांक्षा शद्बबध्द करण्याचा त्यांचा वेगळा पैलू या ग्रंथवाचनातून जाणवतो. या भाषणांतील वाङ्मयीन मूल्यांवर प्रकाश टाकण्याचा संशोधकाचा हेतू आहे.

देशाचे श्रेष्ठत्व हे मानवी सामर्थ्यावर, विचारांवर अवलंबून असते. त्यांच्या योगदानातूनच देशाची उंची वाढत असते. अशा आदर्श व्यक्तीमत्वाचा आदर्श आजच्या तरूण पिढीने जर समोर ठेवला तर निश्चितच देशाची प्रगती होईल. महाराष्ट्राच्या समृध्दीची संकल्पना मनी बाळगणाऱ्या या कर्तृत्ववान नेत्याचा, साहित्यिकाचा, प्रगल्भ विचारवंताच्या विचारांचा अभ्यास हा आजच्या तरूण वर्गाला, समाजाला, राजकारणाला, साहित्यिकांना निश्चितच मार्गदशक ठरेल अशी आशा वाटते.

# यशवंतरावांचे जीवनदर्शन

## महाराष्ट्राची अस्मिता यशवंतराव चव्हाण :-

महाराष्ट्राला थोर संतांची परंपरा लाभलेली आहे. या महाराष्ट्रात अनेक थोर रथी - महारथी जन्माला आले आणि महाराष्ट्र समृध्द- संपन्न झाला. याच महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाणांसारखे असामान्य व्यक्तिमत्व जन्माला आले आणि महाराष्ट्राला वैभव प्राप्त झाले. मराठी माती, मराठी माणसं आणि मराठी भाषा समृध्द करण्यासाठी या अभ्यासू, ज्ञानपिपासू, संयमशील, कर्तव्यदक्ष विचारवंताने मातीशी एकरूप होऊन मातीला पावन करण्याचा प्रयत्न केला. माणुसकीने ओथंबलेले यशवंतराव नावाप्रमाणेच आजही 'यशवंत' ठरले. स्वकर्तृत्वावर एक वेगळे स्थान निर्माण करणाऱ्या यशवंतरावांनी मराठी अस्मितेला नव्या स्वरूपात घडविले.

## १) यशवंतरावांचा जन्म व बालपण :-

महाराष्ट्रानेच नव्हे तर संपूर्ण देशानेही ज्या महापुरूषावर मनापासून प्रेम केले अशा थोर यशवंतरावांचा जन्म १२ मार्च १९१३ रोजी देवराष्ट्रे या गावी त्यांच्या आजोळी झाला. पूर्वीचा सातारा जिल्हयातील सध्याच्या सांगली जिल्ह्यातील पूर्वीच्या खानापूर

नंतरच्या पलूस आणि सध्याच्या कडेगांव तालुक्यातील देवराष्ट्रे हे गाव होय . परंतु स्वत:चा जन्म नेमका कधी झाला हे ते ठामपणे सांगत नव्हते. ते स्वत:च्या जन्माविषयी सांगताना म्हणतात,- '' शाळेचे सर्टिफिकेट एवढाच त्याचा पुरावा आहे. मी माझ्या आईचे पाचवे किंवा सहावे अपत्य असल्यामुळे माझ्या जन्माची नोंद कोणी ठेवण्याची काळजी घेतली नाही. त्या काळी त्यांना अशा गोष्टीची जरूरीही वाटत नसावी माझा जन्म, म्हणजे काही महत्वाचा सुवर्णक्षणआहे. अशी काही परिस्थिती नव्हती.''[1] बळवंतराव वडिल आणि विठाई आई यांच्या पोटी यशवंतरावांचा जन्म झाला. त्यांना ज्ञानदेव व गणपतराव ही दोन भावंडे आणि राधाबाई ही एक बहिण होती.

## तत्कालिन कौटुंबिक परिस्थिती :-

यशवंतरावांचे बालपण देवराष्ट्रे गावातील त्यांचे मामा दाजी घाडगे यांच्या घरी गेले. खरे तर त्यांचे मूळ गाव खानापूर तालुक्यातील ढवळेश्वर हे छोटेसे खेडे आहे. परंतु चव्हाण कुटुंब हे कुणा एका सावकराला दुसऱ्याच्या कर्जाकरिता जामिन राहीले. त्या सावकराची कर्जदाराकडून फसगत झाल्यानंतर जमीनदाराचा जमीन-जुमला ताब्यात घेतला आणि त्या कुटुंबाची या गावातून मुक्तता झाली. त्यानंतर ढवळेश्वरहून विटे जवळ म्हणून या कुटुंबाने प्रथम विटे येथे वास्तव्य केले. यशवंतरावांचे वडिल विट्यामधे बेलिफ म्हणून १९१२ पासून सरकारी नोकरी करू लागले. अतिशय कठिण परिस्थितीत दिवस कंठत असलेल्या या कुटुंबाने आपले कुटुंब व संस्कृती ही मात्र अतिशय जाणीवपूर्वक जपली.

तद्नंतर यशवंतरावांच्या वडिलांची बदली कराड कोर्टात झाली आणि या कुटुंबाचे स्थलांतर कराडला झाले ते कायमचेच. शेतीनिमित्त गावाचा संबंध उरला. त्यांची शेती यशवंतरावांचे चुलते करत होते. त्यांचे वडिल आणि आई या छोटया मुलाला मोठया संस्कारक्षम वातावरणात वाढवत होते. पण त्याच दरम्यान त्यांच्या कुटुंबावर अतिशय मोठे संकट कोसळले. यशवंतरावांचे वडिल प्लेगचा बळी ठरले आणि त्यांचे कुटुंब अनाथ झाले. नियतीने त्यांच्या सुखी कुटुंबावर क्रूर घाव घातला. त्यावेळी यशवंतरावांचे वय फक्त चार वर्षाचे होते. वडिलांच्या मायेला पारखे झालेले यशवंतराव आईच्या प्रेमाखाली वाढू लागले. आईवरही आभाळ कोसळले, कुटुंबाचा आधार गेला. छोटया, छोटया मुलांना घेऊन काही दिवस देवराष्ट्रेतच घालविले. मामाची, आजीची परिस्थिती यथातथाच होती. त्यांच्या आधारावर यशवंतरावांची आई जास्त दिवस न

राहता आपल्या मुलांना घेउन कराडला स्थायिक झाली. यशवंतरावांचे मराठी चौथी पर्यंत शिक्षण देवराष्ट्रेतच पूर्ण झाले. आणि पुढील शिक्षणासाठी ते कराडला आले. दिवाळीच्या आणि उन्हाळयाच्या सुट्टीत ते देवराष्ट्रेला यायचे. वडिल वारल्यानंतर घर कसे चालायचे हा बिकट प्रश्न आईपुढे होता. घरात कर्ता पुरूष कोणीच नव्हता. गावाकडील शेतीचे उत्पन्न चुलत्याकडून कधी मिळायचे तर कधी नाही. अशाच स्थितीत यशवंतरावांच्या वडिलांचे मित्र कराड कोर्टातील बेलीफ श्री शिंगटे यांच्या मदतीने त्यांच्या मोठया भावाला ज्ञानदेव याला वडिलांच्या जागेवर बेलिफची नोकरी मिळाली.

## यशवंतरावांच्या बालमनावर झालेले संस्कार :-

"संस्कारक्षम मन असणे ही देणगी नियतीची । विचाराचें, कृतीचे, साहचर्याचे मनावर परिणाम घडत असतात. संस्कारक्षम मन हे साठवीत राहते आणि त्यातून माणूस घडतो. मी तर घडलो संस्काराने, विचाराने, साहचर्याने माणूस घडत असला तरी माणसाला स्वत:विषयीचे ज्ञान, पूर्णपणाने स्वत:लाच करून घेता येते"[२] असे संस्काराचे महत्व सांगणारे यशवंतराव स्वत: संस्कारसंपन्न तर होतेच पण इतरांनाही सस्कारक्षम बनविण्यासाठी धडपडत होते.

यशवंतरावांचा जन्म ज्या गावात झाला ते गाव देवराष्ट्रे त्या गावातील समाज, आसपासचे वातावरण, कुटुंब, त्या कुटुंबातील माणसे, सभोवतालचा निसर्ग या सर्वांचा परिणाम यशवंतरावांच्या संवेदनशील मनावर खोलवर होत गेला. त्यांचे मामा दाजी घाडगे, आजी, आई, थोरले बंधू गणपतराव यांच्या संस्कारातून यशवंतरावांचे संवेदनक्षम मन घडत गेले.

यशवंतरराव देवराष्ट्रेबद्दल सांगतात-- 'सागरोबाचे शिवार हे देव - देवेंद्राला पडलेले एक स्वप्न आहे, असे मला नेहमी वाटते, स्वत:ला एखादे घरकुल असावे, म्हणून जणू शोधाशोध करीत आलेली देवमंडळी या शिवारात पोहचताच, कायमची स्थिरावली असावीत, आणि या शिवाराचे मग देवराष्ट्र बनवून टाकले"[३] अशा या गावात यशवंतरावांचा अंकुर फुलला. कौटुंबिक स्थिती बेताचीच पण अतिशय संस्कारमय अशा वातारणात यशवंतराव घडत गेले. यशवंतरावांनी देवराष्ट्रेतच प्राथमिक शिक्षण पूर्ण केले होते. त्यामुळे त्यांचे बालपण याच गावात गेले. तेथिल परिस्थिती सांगताना ते म्हणतात - " बऱ्या पैकी शेती असलेली दहापाच कुटुंबे आणि व्यापार, उदीम, सावकारी करणारी दहा-पाच कुटुं बे सोडली, तर बाकीच्या सर्व लोकांच्या जीवनाचा व राहणीमानाचा स्तर

बहुधा एकच होता. कोणी तेली, कोणी सणगर, कोणी धनगर, कोणी मराठा असत,''[४] अशा सर्व धर्मांच्या लोकांत मिळून मिसळून राहणारे त्यांचे मामा व आजी पाहून यशवंतरावही त्याच वातावरणात रमले, वाढले. यातूनच कळत नकळत सर्व धर्मांविषयी आपुलकीची भावना त्यांच्यात रूजत गेली आणि पुढे सत्ता कारणात असताना सर्व धर्मांकडे मानवता वादी दृष्टीने पाहण्याची वृत्ती त्यांच्यात निर्माण झाली.

यशवंतरावांचे बालपण अतिशय सामान्यपणे गेल्याचे दिसून येते. बालपणा विषयी ते सांगतात - '' माझे बालपण हे इतर लक्षावधी गरीब घरांतील मुलांच्या प्रमाणे गेले आहे. खेडयात राहणाऱ्या छोटया व गरीब शेतकऱ्यांची संख्या त्यावेळी सगळीकडे पुष्कळ होती. अशा एका कुटुंबातील मी एक, म्हणून माझ्या जीवनामध्ये इतरांपेक्षा फार काही विशेष होते, असे नाही. सर्वसामान्यत: अडी- अडचणी आणि गरिबी यालाच तेव्हा जीवन असे नांव होते ''[५] स्वत:चे आयुष्य अतिरंजित बनवून सांगण्याचा त्यांचा अट्टाहास नाही. आजोळमधील माणसे, तेथील सामाजिक परिस्थिती, आर्थिक स्थिती, त्यातूनच स्वत:ला आलेले अनुभव यातून त्यांचा पिंड घडत गेला. त्या वातावरणाशी ते एकरूप होऊ लागले त्यांच्या सुख दु:खाशी समरस होऊ लागले.

यशवंतरावांच्या शिक्षणाची सुरूवात देवराष्ट्रेत त्यांच्या आजोळी झाली. अंगात सदरा, धोतर आणि डोक्यावर फेटा अशा पोशाखात त्यांचा पहिला 'श्री गणेशा' सुरू झाला. पहिले शिक्षक बंडू गोवंडे होते. त्यानंतर मात्र ते १९२७ ला कराडला टिळक हायस्कूलमध्ये दाखल झाले आणि ग्रामीण भागातून शहरी वातावरणात वावरू लागले. त्यांचे राहणीमान शहरी बनले. रंगाने सावळे, नाक मोठे, भव्य कपाळ, टपोरे लखलखीत डोळे असणाऱ्या यशवंतरावांनी त्यांच्या पोशाखात पांढरी टोपी, सदरा व धोतर अधेमधे जॅकेट असा बदल केला.

## सुसंस्कारित आईचा प्रभाव :-

यशवंतरावांच्यावर त्यांच्या आईचा मोठा प्रभाव होता. विठाई अतिशय घरंदाज घराण्यातील, सुसंस्कारित वातावरणातील, प्रेमळ आणि कष्टाळू वृत्तीची होती. साधी राहणी आणि उच्च विचारसरणी असलेली ही माता अतिशय संस्कृतीसंपन्न होती. यशवंतरावांच्या संवेदनक्षम मनाला त्यांच्या आईने घडविले, अतिशय शांत स्वभावाच, जिद्दी आणि कष्टाळू वृत्तीने संसार करणाऱ्या या मातेने या पुत्राला अतिशय जबाबदारीने घडविले. वडिलांच्या प्रेमाला मुकलेल्या मुलांना अतिशय मायेने जिद्दीने वाढविण्यासाठी

तिने रात्रंदिवस कष्ट केले, सुखाचा त्याग केला. आणि आपल्या मुलांसाठी आयुष्यभर ती झीजत राहिली. आपल्या आईविषयी ते अभिमानाने म्हणतात- "संपत्तीने नसली तरी संस्काराने माझी आई श्रीमंत होती आणि ती श्रीमंती आंम्हा मुलांपर्यंत पोहोचविण्याचा तिचा सततचा प्रयत्न होता."[६] कौटुंबिक परिस्थिती गरिबीची असुनही अंत:करणमात्र मानवतेने ओथंबलेले होते. या गुणाचा परिणाम यशवंतरावांच्यावर होत गेला. नंतरच्या काळात त्यांनी त्या गुणाचा वापर समाजासाठी केला. त्यांच्या मनामध्ये मातेविषयी पराकोटीचा अभिमान होता. आपल्या जीवनाला यशस्वीतेच्या शिखरावर पोहोचविण्याचे श्रेय ते स्वत:च्या आईला देतात. त्यांची आई अशिक्षित होती. यशवंतराव मुख्यमंत्री झालें परंतु मुख्यमंत्री म्हणजे काय हे तिला माहित नव्हते. जगातील ज्ञानाचा तिला फारसा गंध नव्हता परंतु तिची पुण्याई, तिचा साधेपणा, तिचे प्रेम, तिने लहानपणी शिकविलेले चार दोन छोटे मोठे गुण त्यांच्या उपयोगी पडले.

यशवंतरावांची आई यशवंतरावांना मंदिरामध्ये घेऊन जात. रामायण, महाभारतातील कथा ऐकवित असत. देवावर विश्वास ठेवणारी ही माता दु:खी कष्टींना आधार देऊन कोमजलेली मने टवटवीत करत असे. स्वत:च्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत असताना येणाऱ्या बिकट परिस्थितीला तोंड देण्यासाठी, दारिद्र्यावर मात करून जीवनमार्ग सुकर करण्यासाठी ती माता जात्यावरच्या गाण्यातून ओव्यांतून मोलाचा संदेश देत असे हा संदेश यशवंतरावांना प्रेरणा देणारा ठरला. त्यांच्या संपूर्ण आयुष्यात आईची ही मोलाची शिदोरी त्यांना पदोपदी मार्गदर्शक ठरली.

आईच्या स्वाभिमानी स्वभावातून यशवंतरावांचा सुप्त स्वाभीमान जागृत होत गेला. याचा प्रसंग ते अतिशय अभिमानाने सांगतात असहकाराच्या (कायदेभंग) चळवळीत सहभाग व म्युनिसिपालिटीवर झेंडा फडकविणाच्या गोष्टीवरून १९३२ मध्ये अटक झाली होती. १२ महिन्यांची शिक्षा ठोठावली. तुरूंगात त्यांना भेटण्यासाठी यशवंतरावांचें एक शिक्षक आणि आई जाते. एवढा छोटा मुलगा तुरूंगवास कसा भोगणार या चिंतेने आईचे मन पिळून निघते, व्याकूळ होऊन त्याची चौकशी करते ही त्यांची अवस्था पाहून बरोबर आलेले शिक्षक यशवंतरावांना म्हणाले, " फौजदार साहेब दयाळू आहेत, माफी मागितलीस, तर सोडून देईन म्हणतात।" "काय बोलता तुम्ही, मास्तर? माफी मागायची?" आईने मास्तरांना परस्परच फटकारले, आणि माझ्याकडे बघून ती म्हणाली, माफी मागायचं कारण नाही. तब्बेतीची काळजी घे, म्हणजे झालं. ईश्वर आपल्या पाठीशी उभा आहे"[७] या विठाबाईच्या बोलण्यातून यशवंतरावांना जीवन

जगण्याची दिशा मिळाली. त्यांना स्वाभीमानी वृत्तीतील अभिमान जाणवला. जीवनात कधीही लाचारीने जीवन न जगण्याची शिकवणूक तेव्हाच त्यांना मिळाली. विविध प्रसंगातून यशवंतरावांची एक नवी दृष्टी निर्माण होत गेली. त्यांच्या जीवनाला योग्य ते वळण लागले. डॉ. एस्. एम्. देशमुख आपल्या 'यशवंतराव चव्हाण व्यक्ती आणि वाङ:मय' या प्रबंधात म्हणतात - " माणूस कितीही दु:खी कष्टी असला तरी त्याला उत्तेजन आणि सहानुभूती यांचे खतपाणी मिळाले की, त्याची कोमजलेली जीवनवेल टवटवीत होते. यशवंतरावांच्या आईने अशी कोमजलेली फुले टवटवीत करण्याचा सदैव प्रयत्न केला. यशवंतरावांना त्यांच्या प्रेमळ सहवासात आयुष्यातली काही संस्मरणीय वर्षे व्यतीत करण्याचे सद्भाग्य लाभले. त्यांच्या अनेक थोर स्मृती यशवंतरावांच्या अंत:करणात चिरकाल राहिल्या."[८]

यशवंतराव शालेय जीवनापासून समाज - व्यक्ती. आपले स्वत:चे कुटुंब, मित्र मंडळी यांच्यातील घडणाऱ्या घटना प्रसंगातून घडत असताना काही छोटया- मोठया प्रसंगाचा परिणाम त्यांच्या मनावर होत गेला. वाचन, लेखन यातून त्यांचा वैचारिक पिंड घडत होता. निरनिराळया विषयांचे वाचन त्यांनी केले. त्यामुळे त्यांचे मन प्रगल्भ झाले, विचार करू लागले. यशवंतराव उत्तम साहित्यिक होते. या वाचनाचा परिणाम त्यांच्या मनावर होत गेला. त्यांना आईनेही खतपाणी घातले. या सर्वांचा उपयोग भविष्यात त्यांना होत गेला. आई मनाने अतिशय उदार विचाराची होती. स्वभाव अतिशय प्रेमळ होता या स्वभावाविषयी ते म्हणतात. " आयुष्यातली बरीच वर्षे दु:खाशी सोबत करूनही दिलाचा दिलदारपणा राहणे हे देणे देवाचे असावे लागते. माझ्या आईचे जीवन मला नेहमीच दीपज्योतीसारखे वाटले. दिवा जळत असतो. त्याच्या प्रकाशात माणसे वावरत असतात. पण आपण लोकांच्या उपयोगी पडत आहोत हे त्याच्या ज्योतीला, त्या प्रकाशाला माहित नसते. ते दीपज्योतीचे जळणे आईचे होते "[९] स्वत: दारिद्रयात राहूनही मुलाला आकार देणारी ही माता यशवंतरावांच्या मनातील श्रध्दास्थान होती. स्वाभिमानाने जीवनास सामोरे जाण्याची तिची वृत्ती यशवंतरावांना मार्गदर्शक ठरली.

यशवंतरावांना मातेविषयी अतिशय आदर होता. हा भाव त्यांनी अनेकदा भाषणांतून व्यक्त केलेला आहे. जीवनाची दिशाच आईने त्यांना दिलेली होती त्या वाटेवरून जाताना ते मागे वळून पाहतात तेव्हा ती वाट दाखविणारी माता त्यांना पदोपदी दिसते. आईच्या व्यक्तिमत्वाचा, स्वभावाचा प्रभाव त्यांच्या जीवनावर अतिशय

प्रभावीपणे होत गेला आणि हा पुत्र त्या मातेच्या अनमोल संस्काराची जोपासना करीत गेला. ही संस्काराची विचारांची शिदोरी त्यांना आयुष्यभर नावाडयाप्रमाणे दिशादर्शक ठरली.

## यशवंतरावांवर गणपतराव या बंधूचा प्रभाव :-

यशवंतरावांच्या जडणघडणीमध्ये जसा आईचा मोलाचा वाटा होता. त्याप्रमाणे त्यांचे बंधू गणपतराव यांचाही महत्वाचा वाटा होता. अतिशय धडाडी व्यक्तीमत्वाचे हे गणपतराव विवेकी आणि विचारी वृतीचे होते. त्याचाच परिणाम यशवंतरावांच्या वैचारीक पिंड घडण्यावर होत गेला. फारसे शिक्षण न घेता आलेले हे बंधू यशवंतरावांना घडविणयांत, त्यांचे शिक्षण पूर्ण करण्यात कमी पडले नाहीत. त्यांना तालमीत घेऊन जात. राजकीय विचारांचे वेड असलेल्या या गणपतरावांनी राजकारणातील घडामोडी योग्य अयोग्य कशा? या समजून देण्याचा प्रयत्न केला.

आद्य क्रांतिकार कळंबे गुरूजींच्या 'विजयाश्रमात' गणपतराव जात होते. 'सत्य शोधकीय संस्कार' हा महत्वाचा उद्‌देश या आश्रमाचा होता. त्याचे ते कार्यकर्ते होते. घर्र आल्यानंतर दररोज ते यशवंतरावांशी दिवसभराच्या घडामोडींवर चर्चा करत आणि त्यातूनच यशवंतरावांचा मनोव्यापार विकसित होत गेंला. त्यांच्याही मनावर सत्य शोधकीय विचारांचे संस्कार होत गेले. १९२७ च्या दरम्यान राजकारणातील विचारांचे आकर्षण वाढले गेले आणि त्यांनी राजकारणात प्रवेश केला. म. फुलेंचे विचार समजून घेण्यासाठी गणपतरांवांनी यशवंतरावांना 'शेतकऱ्यांचा आसुड','गुलामगिरी', 'म. फुले चरित्र' ही पुस्तके वाचावयास सांगितली. त्या वाचनानंतर यशवंतराव म्हणतात - ''शेतकरी समाजाची होणारी पिळवणूक, दलित समाजावर होणार अन्याय आणि शिक्षणापासून वंचित ठेवलेला बहुजन समाज व स्त्रिया यांचे प्रश्न सोडविल्या खेरीज देशाचे कार्य होणार नाही. हा त्यांच्या विचारांचा सारांश माझ्या मनामध्ये ठसला.''[10] वाचनातून त्यांना सामाजिक दृष्टी प्राप्त झाली. त्यांचा वैचारीक पिंड घडत गेला याचे श्रेय ते आपल्या बंधुलाच देतात. त्यावेळी 'श्रध्दानंद', 'मजूर', 'राष्ट्रवीर', 'विजयीमराठा' ही वृत्तपत्रे प्रसिध्द होत. ती गणपतरावामुळेच त्यांना वाचावयास मिळाली. तेव्हापासून त्यांना वाचनाची आवड निर्माण होत गेली.

गणपतराव अतिशय ध्येयवादी स्वभावाचे होते. घरची परिस्थिती सुधारावी यासाठी ते इंदोर जिल्हयातील मरोठ या गावी शेती करण्यासाठी गेले. परंतु अतिशय

अथक प्रयत्न, करूनही ते अयशस्वीच परतले. गरिबीतून मार्ग काढण्यासाठी धडपडणारे, संकटांशी संघर्ष करणारे, दु:खातून सावरणारे हे गणपतराव कुटुंबासाठी खूप करत. हे सर्व यशवंतराव पाहत होते. त्यागाची वृत्ती यशवंतरावांनी त्यांच्या कडूनच घेतली. एकूणच यशवंतरावांच्या व्यक्तिमत्वावर आपल्या बंधुचा खूपच प्रभाव पडला होता. याचा ते वेळोवेळी 'कृष्णाकाठ' या आत्मचरित्रामध्ये उल्लेख करतात. सामाजिक, राजकीय घडामोडीवर त्यांच्या नेहमी चर्चा होत. यशवंतरावांच्या प्रत्येक गोष्टीत त्यांचे लक्ष असे. व्यायामाची आवडही त्यांनीच निर्माण केली. ते सांगतात - " दुसरे काही करत नाहीस, निदान पोहत तरी जा" अशा प्रत्येक गोष्टीत त्यांना गणपतराव मार्गदर्शन करीत असत.

गणपतरावांचा मित्रपरिवार फार मोठा होता. त्यांच्या विविध विषयांवरील चर्चा यशवंतराव ऐकत त्यातून त्यांना राजकीय, सामाजिक घडोमोडींविषयी खूपच काही समजत गेले. लाघवी स्वभावाचे गणपतराव अतिशय प्रेमाने कुटूंबात वावरत असत. परंतु यशवंतरावांना वेळोवेळी सल्लाही देत असत. घरच्या परिस्थितीची जाणीव करून देत. ते म्हणतात - "तुला पटत असेल तसे कर पण आपल्या कुटुंबाची परिस्थिती तू नजरेआड करू नकोस"[11] गरिबीची जाणीव असलेल्या गणपतरावांची ही मनोवृत्ती यशवंतरावांच्या मनावर बिंबत गेली.

थोडक्यात यशवंतरावांचे जीवन समृध्द करण्यासाठी, सामाजिक, राजकीय दृष्टी निर्माण करण्यासाठी गणपतरावांच्या विविधांगी व्यक्तीमत्वाचा त्यांच्यावर खोलवर परिणाम होत गेला. जीवनाशी संघर्ष करणे, संकटांना न डगमगता सामोरे जाणे, गरिबीतून मार्ग काढत राहणे, सामाजिक बांधिलकी जोपासणे या गुणांचे यशवंतरावांच्या मनावर बिजारोपण करण्याचे महत्वपूर्ण श्रेय हे गणपतरावांनाच त्यांनी दिलेले आहे. त्यांच्या बंधुमुळे वैचारिकरित्या घडत जाणारे यशवंतराव भविष्यात त्या विचारांच्या पायवाटेनेच यशस्वी जीवनापर्यंत पोहचले.

## यशवंतरावांचे शालेय जीवन :-

'शिक्षण ही एक शक्ती आहे' असे समजून समाजात शिक्षणाचे महत्व वाढले आहे. यशवंतरावांच्या आईने हे शिक्षणाचे महत्व लक्षात घेऊनच आपल्या मुलांना शिक्षित करण्याची धडपड चालू ठेवली होती. यामध्ये परिस्थितीमुळे गणपतराव या बंधुचे शिक्षण अर्धवट राहिले. परंतु यशवंतरावांचे शिक्षण पूर्ण करण्याचा ध्यास या मातेने आणि बंधुने

घेतला. गरीब कुटुंबातली ही माता मनाने, स्वभावाने आणि संस्काराने अतिशय श्रीमंत होती. याच श्रीमंतीच्या जोरावर तिने हे यशवंतरावांना उभे केले.

यशवंतरावांच्या शिक्षणाचा पहिला 'श्री गणेशा' आजोळी देवराष्ट्रे गावात झाला. अतिशय मागासलेल्या ग्रामीण जीवनात यशवंतरावांचे बालपण वाढत होते. ते म्हणतात- ''ग्रामीण जीवनाची पार्श्वभूमी हा माझ्या जीवनाचा श्री गणेशा आहे''[१२] मामा दाजी घाडगे व आजी यांच्या सामान्य शेतकऱ्याच्या घरी यशवंतरावांचे शिक्षण सुरू झाले. यशवंतरावांच्या आईने पती निधनानंतर थोडे दिवस देवराष्ट्रेत काढले. त्यावेळी यशवंतराव तेथील शाळेत जाऊ लागले. त्यांच्या शालेय जीवनाची सुरूवात ते सांगतात -'' माझी पहिली शाळा देवराष्ट्राची आहे. गावच्या पश्चिमेला उंचशा पठारावर एका तळयाच्या काठी असलेली दोन-तीन खोल्यांची शाळा मला आजही प्यारी वाटते. पाहिला श्रीगणेशा मी तेथे शिकलो. तो शिकविणारे माझे पहिले शिक्षकं बंडू गौंवडे यांना मी आजही स्मरतो''[१३] बालमनावर झालेले संस्कार त्याचे महत्व अनन्यसाधारण असते याचे स्मरण यशवंतराव करूनच गुरूविषयी आदरभाव मनी ठेवतात. गुरूंनी दिलेली अनमोल शिदोरी आयुष्यभर जपतात.

देवराष्ट्रे गावाविषयी यशवंतरावांना कमालीचा अभिमान वाटत असे. त्या गावाविषयी म्हणतात - '' कुतुहल आणि जिव्हाळा वाटावा असाच हा परिसर आहे. देवपण घेऊन जन्माला आलेले हे गाव पण याच्यात राष्ट्र ही कल्पना सामावलेली आहे. सागरोबाच्या चोहोबाजू आनंद बनाने भरलेल्या धर्म, अर्थ, कर्म,मोक्ष हे चारही पुरूषार्थ येथे सार्थपणे वावरत असत. सुपीक जमिनीत बी पेरले, म्हणजे चांगले फोफावते तशी इथली माणसे आणि मने। या मातीचा गुण आणि माणसांचे मोल हिंडता- फिरता दिसू लागते''[१४] याच भूमीला यशवंतराव 'सोनहिऱ्याची अमृतभूमी' म्हणत. गावाच्या उत्तरेस 'सोनहिरा' ओढा वाहतो या ओढयात डुंबण्यासाठी यशवंतराव जात असत. नंतर कराडला राहण्यासाठी गेल्यानंतरही दिवाळी- उन्हाळी सुट्टीत जेव्हा यशवंतराव आजोळी येत असत तेव्हाही या ओढयामध्ये डुंबण्यासाठी काठावरील गर्द झाडीत वाचन करण्याबरोबरच निसर्गाच्या एकांतात रमत असत. शेतीव्यवसाय हा प्रमुख व्यवसाय या गावात चालत असे. अतिशय कष्टमय पध्दतीचे जीवन जगणाऱ्या या साध्या आणि प्रेंमळ माणसांच्यातील जिव्हाळा यशवंतरावांना मोहवून टाकतो. आजूबाजूच्या सणगर, रामोशी, धनगर, मुसलमान समाजात ते मिसळत त्यांच्या जीवनाशी ते एकरूप होत यातूनच त्यांच्यामध्ये सर्वधर्म समभावाची भावना रूजली गेली. ती उत्तरायुष्यात त्यांना

मोलाची ठरली. ते गावाविषयी म्हणतात- ''सज्जनांचा जिव्हाळा आणि सरस्वतीचे सौंदर्य या भूमीला जसे लाभले आहे तिच्या सद्गुणाला चांगुलपणाचे तेज आहे. भव्यत्व आणि दिव्यत्व यांनी इथे परिसीमा गाठली आहे.''[१५] अशा या पवित्र भूमीत यशवंतरावांचे बालपण गेले. जे पाहिले अनुभवले ते त्यांनी अनुभवांच्या शिदोरीवर तोलून पुढील आयुष्यास उपयुक्त ठरविले.

प्राथमिक शिक्षणाची एक-दोन वर्षे झाल्यानंतर त्यांना पुढील शिक्षणासाठी कराडमधील टिळक हायस्कुलमध्ये प्रवेश घेतला. याच दरम्यान संपूर्ण देशभर सत्याग्रह, कायदेभंग, गांधीवाद, मार्क्सवाद या विचारांची वादळे उठली होती. राजकारण, समाजकारण, धर्मकारण, अर्थकारण यामधील गलबल्याचा हा कालखंड होता. याच दरम्यान कराड सारख्या शहरामध्ये ग्रामीण भागातून आलेले यशवंतराव नवीन वातावरण तेथिल राहणीमान, घरे, शाळा, माणसे हे पाहून अचंबित झाले. मागास राहिलेला ग्रामीण समाज आणि सुविधांयुक्त जीवन जगणारा शहरी समाज यांच्यातील तफावत त्यांच्या लक्षात आली. खेड्यातील वातावरणात राहिलेले यशवंतराव शहरात रमले. टिळक हायस्कूलमधील दत्तोपंत पाठक, शेणोलीकर, द्विवेदी इ. शिक्षकांच्या मार्गदर्शनातून ते शिकत गेले. एका वर्षात तीन इयत्ता पास होण्याचा कोर्स ते पास झाले. या हायस्कूलमधील शिक्षक अतिशय ज्ञानी होते त्यामुळे त्यांची मनोभूमी विकसित होत गेली. टिळक हायस्कूलमध्ये टिळकांच्या व्यक्तिमत्वावर आधारीत अनेक कार्यक्रम व्हायचे. त्यांचे विचार आणि आयुष्य या विषयांवरती वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा आयोजित केल्या जात. यशवंतराव त्यामध्ये सहभागी होत. यातून कळत-नकळत टिळकांच्या विचारांचा प्रभाव मनावर उमटत गेला. म. फुले आणि टिळक यांच्या विचारांतील वेगळेपण त्यांच्या लक्षात आले. ते म्हणतात- '' स्वराज्याचा विचार टिळकांनी सांगितला आणि गरिबांची शिक्षणाने प्रगती झाली पाहिजे व समाजात समानता निर्माण झाली पाहिजे हा विचार म. फुल्यांनी सांगितला. हे दोन्ही विचार महत्वाचे, म्हणून दोन्ही माणसे आपल्या दृष्टीने मोठीच आहेत, या निर्णयाला मी माझ्या मनाशी आलो.''[१६] यशवंतरावांची वैचारिक प्रगल्भता विकसित होत होती. वाचनाचा, लेखनाचा छंद त्यांना लागला . याच दरम्यान सन १९३१ मध्ये पुण्यामधील नुतन विद्यालयातील 'ग्राम सुधारणा' या विषयावर त्यांनी भाषण करून रू. १५० चे बक्षीस मिळविले. हे त्यांच्या आयुष्यातील पहिले भाषण होय. यातील विचार जणू त्यांनी भविष्यात ध्येयपूर्तीसाठी अंमलात आणले.

यशवंतरावांना एके दिवशी शाळेमध्ये त्यांच्या शेणोलीकर मास्तरांनी एक प्रश्न विचारला – '' तू पुढे कोण होणार?'' तेव्हा 'मी यशवंतराव चव्हाण होणार' असे त्यांनी उत्तर दिले. परंतु मास्तरांना याचा अर्थबोध झाला नाही. भविष्यात यशवंतराव स्वबळावर, स्वकर्तृत्वार मोठे झाले आणि खरोखरच ''यशवंतराव चव्हाण'' म्हणून ओळखले जाऊ लागले. ते 'यशोदीप' ठरले. यशवंतरावांनी वाचन, लेखन, मनन,चिंतन यावर अधिक भर देण्यास सुरूवात केली. यातून ते विविध विषयांवर भाषणे करू लागले, लेखन करू लागलें. अन् हळूहळू ते मोठे साहित्यिक आणि वक्तृत्वाचा सम्राट ठरले. वृत्तपत्र वाचनही ते नित्यनेमाने करत होते.

याच दरम्यान १९३२ मध्ये त्यांना असहकार चळवळ व म्युनिसिपालटीवरील ध्वजारोहण यावरून तुरूंगवास भोगावा लागला. त्यांच्या जीवनातला हा पहिला तुरूंगवास होता. निबंधस्पर्धेतील मिळालेली बक्षीसाची रक्कम या प्रसंगात त्यांनी दंड भरण्यासाठी वापरली आणि ते तुरूंगांतून सुटले. यशवंतराव २१ व्या वर्षी मॅट्रीक पास झाले घरामध्ये सर्वांना खूप आनंद झाला. पुढील शिक्षणासाठी कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमध्ये प्रवेश घेतला आणि त्यांचे महाविद्यालयीन जीवन सुरू झाले.

## महाविद्यालयीन शिक्षणातून घडलेले यशवंतराव :-

मॅट्रीक पास झाल्यानंतर खरे तर पुढील शिक्षणाविषयी अस्थिरता निर्माण झालेली होती. परंतु नंतर मात्र सर्व कुटुंबाने विचार करून त्यांना कोल्हापूरला राजाराम महाविद्यालयात प्रवेश घेण्यास संमती दिली. राजाराम महाविद्यालयाची शिस्त अतिशय कडक होती डॉ. बाळकृष्ण हे तेथिल प्राचार्य होते. अतिशय उत्तम प्रशासक म्हणून त्यांचा लौकिक होता. प्रसिध्द लेखक ना. सि. फडके, माधव ज्युलियन, डॉ. बोस इ. नामवंत प्राध्यापक यशवंतरावांना लाभले होते. या चार वर्षामध्ये यशवंतरावांची वैचारिक मनोभूमी परिपक्व होत गेली. उत्तम प्राध्यापकांच्या मार्गदर्शनामुळे यशवंतरावांना प्रेरणा येत गेली. सभोवतालचे वातावरण प्रसंग, परिस्थिती, यातून ते घडत गेले वृत्तपत्रे वाचन पुस्तकांचे वाचन यांचा जबरदस्त छंद यशवंतरावांना जडला. जे हाती पडेल ते वाचावे त्यावर मित्रां समवेत, प्राध्यापंकांबरोबर चर्चा करावी, आपल्या शंकाचे निरसन करून घ्यावे, संस्कारक्षम मनावर सामाजिक, राजकीय, धार्मिक घडामोडीतील घटना जाणून घ्याव्यात, त्यावर विचारवंतांशी विचारविनिमय करावा, आपलेही मत देण्याचा प्रयत्न करावा. असा हा कालखंड अतिशय वैचारिक प्रगल्भतेचा ठरला.

ना. सि. फडके यांच्या लेखनाचा यशवंतरांवावर जबरदस्त प्रभाव पडत गेला. त्यांचा एकही तास कधी यशवंतरावांनी चुकविला नाही. 'जादूगर', 'दौलत' या त्यावेळी अतिशय प्रसिध्दी मिळविलेल्या कादंबऱ्या त्यांनी वाचल्या. एक मोठा लेखकच आपणास शिकविण्यास आहे याचा फार मोठा अभिमान यशवंतरावांना वाटत होता. माधव ज्युलियन यांची व्याख्याने यशवंतराव मन लावून ऐकत होते. डॉ. बोस, डॉ. उपाध्याय यांचेही विचार त्यांना प्रेरणा देणारे ठरले. यशवंतराव या प्राध्यापकांबाबत म्हणतात - ' शैक्षणिक जीवनातल्या अशा व्यक्तींचा प्रभाव हा बराच काळ टिकून असतो व एका अर्थाने तो अविस्मरणीय असतो. कारण त्यांच्याकडून घेतलेले संस्कार हे कायम टिकणारे असतात''[१७] ना. सी. फडके हे उत्तम मराठी शिकवत होते तर माधवराव इंग्रजी शिकवित होते. डॉ. उपाध्याय अर्धमागधी हा विषय शिकवित तर इतिहास हा विषय प्राचार्य शिकवित होते . डॉ. बोस इंग्रजी शिकवित. उत्तम प्राध्यापकांविषयी त्यांच्या मनात आदर होता. त्यांच्या बुध्दिविषयी कुतुहल होते. या विचारांतून, अनुभवांतून ते घडत होते.

यशवंतरावांचे कॉलेज जीवन असे फुलत बहरत होते. वेगवेगळया प्रसंगातून नवनवीन अनुभव घेत होते. त्यातून विचार करत होते आणि स्वत:ची एक वेगळी दृष्टी तयार होत होती. त्यांच्या जीवनातली ही चार वर्ष वैचारिक दृष्टया अतिशय महत्वाची होती. ते म्हणतात- '' कोल्हापूरची उच्च शिक्षणाची ही चार वर्षे माझ्या आयुष्यातील पायाभूत आणि गतिमान अशी वर्षे आहेत. गेल्या तीन वर्षाच्या राजकीय अनुभवानंतर मी आता सर्व परिस्थिती व विचारांतील भेदांभेद्रांकडे काहीशा तटस्थ वृत्तीने पाहू शकत होतो.''[१८] यशवंतराव अधेमधे कराडला येत होते. राजकीय चळवळीतील काम पाहत होते. मित्र मंडळीत वावरत त्यांच्या चर्चा ऐकत, आपले मत मांडण्याचा प्रयत्न करीत होते. विचारांची देवाण घेवाण होत होती. यातून वैचारिक क्षमता अधिक विकसित होऊ लागली. यावेळीच त्यांना साहित्याचीही गोडी लागली. तेथिल वातावरणाचा त्यांच्यावर परिणाम होत गेला. वेगवेगळे छंद त्यांनी जपले. हळूहळू हुशार विद्यार्थी आणि राजकीय क्षेत्रातील छोटा कार्यकर्ता म्हणूनही कॉलेज त्यांना ओळखू लागले. इथेच त्यांच्या सार्वजनिक जीवनाचा, वैचारिक प्रगल्भतेचा, भाषण-कौशल्याचा भक्कम पाया घातला गेला. जो भावी आयुष्यात त्यांना यशस्वी जीवनाकडे घेऊन जाण्यास उपयुक्त ठरला. यशवंतरांवानी कॉलेजची परीक्षा दिली आणि त्यांचा निकाल लागला. १९३८ मध्ये यशवंतराव बी. ए. झाले.

बी. ए. नंतर पुढे काय? हा प्रश्न सर्वांना पडला. खूप विचारांती मित्रांच्या सल्यानुसार त्यांनी पुणे येथे एल्. एल्. बी. ला प्रवेश घेऊन कायद्याचा अभ्यास सुरू केला. परंतु आर्थिक परिस्थिती नाजूक होती. यशवंतरावांच्या आईंना काय करावे सुचेना तेव्हा त्यांचे बंधु गणपतरावांनी गावाकडील जमीन विकावयाचा निर्णय घेतला. यशवंतरावांचे बंधु म्हणतात - " तुझ्या दोन वर्षाचा खर्च निघेल इतकी त्या शेतीची जरूर किंमत येईल तेव्हा आपण ती जमीन विकून टाकूया"[१९] आणि यशवंतराव पुण्याला आले. विद्येचे माहेरघर असणाऱ्या या नगरीत यशवंतराव त्यांचे मित्र आत्माराम पाटील यांचेकडे राहिले. एक वर्षभर त्यांच्याकडे राहिल्यानंतर ते शुक्रवार पेठेतील श्री स.आ. जोगळेकर यांच्या माडीवर राहण्यास गेले.

पुण्यामध्ये यशवंतराव स्थीर झाले. कायद्याचा अभ्यास मन लावून करू लागले. आईने त्यांना सांगितले " आता तुझी परीक्षा होईपर्यंत कृपा करून निदान तुरूंगात जाऊ नकोस, परीक्षा झाल्यानंतर तुला काय करावयाचे ते तू जरूर कर"[२०] त्यांचे पहिले वर्ष वाया गेले होते नंतर मात्र त्यांनी अतिशय मन लावून अभ्यासाला सुरूवात केली. ते म्हणतात - "अभ्यास करू लागल्यावर विषयामध्ये रस निर्माण होतो आणि मग त्यातील सौंदर्यस्थाने लक्षात येऊ लागतात."[२१] पुण्यामध्ये त्यांच्या अनेक साहित्यिकांशी ओळखी झाल्या. वाड:मयीन मंडळे, राजकीय अभ्यासमंडळे, संमेलने, सभा यामध्ये ते सहभागी होऊ लागले. याचा परिणाम त्यांच्या साहित्याच्या आवडीवर होत गेला. यशवंतराव लायब्ररीमध्ये खूप वेळ जावून बसत होते. या दरम्यान केशवराव पाटील, श्री पागे, चंद्रोजी पाटील यांचाशी त्यांचे चांगले संबंध प्रस्थापित झाले. अशा सर्वांगिण घडामोडींतून यशवंतरावांचे व्यक्तिमत्व आकार घेत होते. १९४० ला ते वकिली परीक्षा पास झाले.

यशवंतराव कराडला वकिलीचे प्रॅक्टीस करू लागले. एक वर्षभर त्यांनी वकिली केली असेल महिन्याला चार - पांचशे रू. हाती पडत होते. परंतु त्यांचे मन या व्यवसायात रमत नव्हते. त्यांना समाजकारणाची राजकारणाची जास्त आवड होती. त्यांच्या मनात येई - "जर आपले सगळे आयुष्य या वातावरणात असेच जाणार असेल, तर माझ्या ज्या आशा व आकांक्षा मनामध्ये धरून मी शिक्षण पुरे केले, ते एका अर्थाने व्यर्थ आहे."[२२] या विचाराने त्यांचे मन निराश झाले. त्यांच्या लक्षात आले की आपले मन कधीच वकीलीत रमणार नाही आणि त्यांनी वकिली व्यवसायास रामराम ठोकला. आणि आपले संपूर्ण जीवन त्यांनी समाजकारण, राजकारण यामध्ये झोकून दिले. माझा समाज,

माझी माणसं यांच्यासाठी काहीतरी करावे अशी त्यांची धारणा झाली होती. सुहृदयता यशवंतरावांच्या ठायी असल्यामुळे त्यांनी आपले ध्येय मानवाचे कल्याण करणे हेच ठरविले. त्यासाठी त्यांनी राजकारणाची साथ घेतली आणि त्यातून समाजकारण सुरू केले.

वाचन संस्कार :-

वाचन संस्कार हे सर्वात श्रेष्ठ संस्कार होय. वाचन संस्कृतीमुळे मानवाची सृजनशिलता विकसित होत असते. यशवंतरावांना वाचनाचा जबरदस्त छंद जडला होता. 'ग्रंथ हेच गुरू' त्यांनी मानले होते. लहानपणापासूनच त्यांना वाचनाची आवड निर्माण झाली ती त्यांच्या आईमुळे. आई रामायण, महाभारत, किर्तन, प्रवचन, भजन ऐकायला मंदिरात नेत होती. त्यातून यशवंतरावांना पौराणिक गोष्टी ज्ञात होत गेल्या. त्यातील एखादी घटना जर समजली नाही तर ते आईला शंका विचारत होते. आई त्यांना समजून सांगत असे. यशवंतराव हळूहळू कुतुहलापोटी, जिज्ञासेपोटी नवनवीन पुस्तके, वृत्तपत्रे अधाशासारखे वाचत राहिले आणि त्यातून त्यांना वाचनाची प्रचंड आवड निर्माण झाली. जीवनाच्या व्यापक प्रवाहात त्यांना या वाचनाचा भरपूर उपयोग झाला. आईने त्यांच्यात रामायणाची आवड निर्माण केल्याचे यशवंतराव सांगतात. साखरेबुवांची 'सार्थ ज्ञानेश्वरी' यशवंतरावांकडून त्यांच्या आईने वाचून घेतली. त्यानंतर यशवंतरावांनी आईस त्याचा सारांश विचारला असता आई म्हणते, ''कृष्णदेव अर्जुनाला सांगतात, की तू आपला 'मी' पणा सोड आणि जे तुझे काम तू केले पाहिजेस, ते तू करीत रहा.''[२३] इतका साधा, सरळ आणि सोपा अर्थ भूतलावर कोणत्याही विद्धानाने, पंडिताने सांगितला नसता. यातूनच त्यांना स्वत्वाविषयीची जाणीव, कर्तव्य याची जाण येत गेली.

यशवंतरावांनी शालेय जीवनात वाचनाचा छंद जोपासताना योग्य तेच वाचन करण्याचा मानस ठेवला. त्याचबरोबर वृत्तपत्रांचे वाचन ते नित्य नियमानं करीत होते. 'ज्ञानप्रकाश', 'विविधवृत्त', 'श्रध्दानंद', 'हरिजन', 'राष्ट्रवीर', 'मजूर', 'विजयीमराठा' ही वृत्तपत्रे, साप्ताहिके वाचत असत. दैनंदिन घडामोडीतून त्यांचा मनोव्यापार विकसित होत गेला. शालेय जीवनात हरिभाऊ आपटे यांची 'पण लक्षात कोण घेतो?' केतकरांची 'ब्राम्हणकन्या' या कांदबऱ्या त्यांनी वाचून काढल्या. टिळक हायस्कूलमध्ये टिळकांच्या जीवनावरती निंबध - वक्तृत्वस्पर्धा होत असत त्या निमित्ताने

यशवंतरावांनी टिळकांच्या जीवनावरील अनेक पुस्तके वाचून काढली. यशवंतरावांनी या स्पर्धांमध्ये अनेक बक्षीसेही मिळविली होती . ते दिवाळी - उन्हाळयाच्या सुट्टीसाठी देवराष्ट्रेला जात. पण जाताना बरोबर काही पुस्तकेही घेऊन जात होते. 'सोनहिरा' ओढयाच्या काठी गर्द झाडीत बसून तासन्तास वाचन करत. या परिसरामुळे त्यांना वाचनामध्ये अधिकच रस वाटू लागे. ते म्हणतात, " देवराष्ट्रात शेतावर जाताना मी 'मेघदूत' घेऊन जाई. शेताच्या कडेने झुळझुळ वाहणारा 'सोनहिरा', आंब्याची गर्द आंबराई, चैत्र-वैशाख, ज्येष्ठाचे ते दिवस, आंब्यावर कुठेतरी बसलेली कोकिळ कुहू कुहू करायची आणि 'आषाढस्य प्रथम दिवसे' माझे पाठांतर चालू असायचे."[२४] त्यांची वाचनाची गोडी दिवसें दिवस वाढत होती. आणि ते झपाटल्यासारखे सतत वाचन करीत होते.

यशवंतरावांनी 'श्यामची आई' हे पुस्तक खूपच आवडीने वाचले. संस्काराची शिदोरीच जणू त्यांनी त्यातून आत्मसात केली. महाविद्यालयीन जीवनात त्यांना प्रसिध्द लेखक ना. सी. फडके, माधव ज्युलियन हेच शिकविण्यास होते. ग. दि. मांडगूळकर, हरिभाऊ आपटे, लक्ष्मणशास्त्री जोशी, दत्तो वामन पोतदार, केतकर, वि.स. खांडेकर यासारख्या लेखकांची अनेक पुस्तके यशवंतरावांनी वाचून काढली यातूनच त्यांचा वैचारिक पिंड घडत गेला. यशवंतरावांना नाटकांचेही फार वेड होते. 'राजसंन्यास', 'प्रेमसंन्यास', 'बेबंदशाही', 'मृच्छकटिक', 'माईसाहेब', 'शाकुंतल', 'मेघदूत' ही नाटके त्यांनी मनापासून वाचली होती. शेक्सपिअरची नाटकेही यशवंतरावांनी अभ्यासली होती. अनेक इंग्रजी कादंबऱ्या त्यांनी वाचल्या. नेपोलियन, गॅरीबाल्डी, डी. व्हॅलेरा, व्हिक्टर हयुगोंची लॉमिझरा ब्ले याबरोबरच 'क्विन व्हिक्टोरिया', 'बॉडी गार्ड ऑफ लाइफ' , आऊटलाईन ऑफ हिस्टरी इ. पुस्तकांचे वाचन यशवंतरावांनी अतिशय मनपूर्वक केले. तुरूंगामध्ये 'माझी जन्मठेप, लो. टिळक चरित्र, गांधी, टॉलस्टॉय, रविंद्रनाथ टागोर, एम्. एन्. रॉय यांचे साहित्य आदि पुस्तके त्यांनी वाचली. गॉर्की यांची आई कादंबरी, संत ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयातील काव्याचा गोडवा त्यांनी चाखला त्यामुळे त्यांचा समाजाभिमुख पिंड घडविण्यात मोठी मदत झाली. इंग्रजी भाषेतील विषय, भाषा, आशय संपन्नता त्यांच्या लक्षात आलेली होती. कोणत्याही पुस्तकातील विचार अतिशय काळजीपूर्वक ते वाचत असत. कोणताही विचार हा क्रियाशील होण्यापूर्वी तो भावनेने समजून घ्यावा लागतो आणि भावना जर अपुरी असेल किंवा चुकीची असेल तर त्यातून येणारा निर्णय, त्यातून येणारा विचार हा अपुरा आणि चुकीचा असण्याची शक्यता असते.

आणि म्हणून 'अवेअरनेस' ची अतिशय आवश्यकता आहे. असा विश्वासात्मक विचार यशवंतराव मांडतात. आजच्या तरूण पिढीला मार्गदर्शक ठरणारे हे विचार अतिशय मौलिक स्वरूपाचे आहेत.

यशवंतरावांनी विविध विषयांवर वाचन केलेले दिसून येते. अनेक वाङःमय प्रकार त्यांनी हाताळले होते. ते म्हणतात- '' गंभीर, विचारप्रधान ग्रंथचरीत्र वा आत्मचरित्रे, कथा- कवितासंग्रह आणि कादंबरी अशी या प्रवाहाची वाटणी प्रसंगानुसार असते. गंभीर व विचारप्रधान ग्रंथात माझे आवडीचे विषय राजकारण आणि इतिहास हे आहेत. चरित्रे व आत्मचरित्रे मी वाचतो. अर्थात चरित्रनायक कोण आहे, याच्यावर निवड निश्चित अवलंबून असते''[२७] सर्व वाङ्मय प्रकार हाताळणारा हा पुस्तकप्रेमी, साहित्यप्रेमी खऱ्या अर्थाने रसिक होता. हरिभाऊ आपटयांपासून अगदी अलीकडच्या नवलेखकांपर्यंत त्यांनी वाचन केले होते. अनेक लेखकांच्या पुस्तकांवर त्यांनी अभिप्राय पाठविले आहेत. अनेकांना प्रस्तावना लिहिल्या आहेत. साहित्यिकांबद्दल त्यांना आदर होता. त्यांच्या प्रतिभा शक्तीचा यशवंतरावांना अभिमान वाटे. अतिशय सन्मानाने त्यांना वागवत. राजकारणात अनेक साहित्यिकांना त्यांनी मानाच्या जागा दिल्या. अनेक साहित्यिकांच्यात ते मिसळत असत. साहित्य संमेलनांना उपस्थित राहत, साहित्य मंडळात जाऊन ते चर्चेत सहभागी होत. आवडलेले पुस्तक वेळ देऊन वाचत असत. परंतु त्यांच्या वाचनात कोणी अडथळा आणला तर त्यांना अजिबात आवडत नसे.

यशवंतराव राजकारणात पडल्यानंतर एवढया प्रचंड व्यापातूनही आपली वाचनाची आवड जागृत ठेवत, परदेश दौऱ्यावर जाताना मोजकी पुस्तके घेऊन जात आणि प्रवासात वाचत असत. यशवंतरावांचे बरेचसे वाचन हे प्रवासात झालेले आहे. 'विदेश दर्शन' मध्ये वेणूताईस लिहिलेल्या पत्रांमध्ये अनेक पुस्तकांची त्यांनी वारंवार चर्चा केलेली आढळते. वाचनातून माणूस घडत असतो, त्याच्यावर संस्कार होत असतात यातूनच नवसमाज निर्मिती होण्यास मदत होते.

यशवंतरावांचा जो वैचारिक पिंड होता तो वाचनातून घडलेला होता. उत्तम साहित्य निर्मिती वाचनामुळेच झालेली होती. समाजाचा सर्वंकष विचार वाचनाच्या प्रगल्भतेतूनच प्राप्त झालेला होता. वाचनसंस्काराचा जबरदस्त प्रभाव यशवंतरावांच्या वैचारिक सामाजिक वृत्तीवर पडलेला दिसून येतो. यशवंतराव वाचनाच्या सवयीविषयी सांगतात- '' अहो, काही काळ मी तरूणपणी रॉयिस्ट मित्रांच्या संगतीत घालवला होता.

ती सगळी मंडळी विद्धान, त्यांच्याचमुळे वाचनाचे वेड वाढले. दररोज काहीतरी वाचायचे, त्या शिवाय झोपायचे नाही, ही सवय पुढे इतकी जडली की, हल्ली सुध्दा कामाच्या रगाडयातून रात्री झोपायला कितीही उशीर झाला तरी काही तरी वाचल्या शिवाय झोपच येत नाही. त्यामुळे वाचन होते.''[२६] असे वाचनाचे महत्व जाणण्याचा यशवंतरावांनी वाचनातून सुसंस्कारित व्यक्तिमत्वाचा विकास केला. बालपणापासून त्यांच्या मनावर होणाऱ्या संस्कारातूनच त्यांचा व्यक्तिमत्व विकास झाला. संस्कार हा मानवी मनाचा विकास करते. सुसंस्कार, माणसाला मानवतावादापर्यंत घेऊन जातात. यशवंतरावांच्या बाबतीत हा विचार तंतोतंत लागू पडतो.

संस्कारक्षम यशवंतरावांविषयी लेखक विठ्ठलराव पाटील म्हणतात-'' यशवंतरावांच्या व्यक्तिमत्वाचा आलेख रेखाटताना दिसते की, ते थोर देशभक्त, रसिक व्यक्तिमत्व, धुरंधर मुत्सद्दी, विचारवंत, गुणग्राही, सौजन्यमुर्ती, व्यवहारी राजकारणी, दिलदार मित्र व लोकांच्या प्रेमात गुरफटलेला नेता असे या चित्रांची एक पाकळी उमलून येते, तर समर्थ समाजवादी, लोकशाही निष्ठा, लोकशाहीचे पुरस्कर्ते, थोर - चारित्र्यसंपन्न समाजसेवक, अभिरूची संपन्न सुसंस्कृत कला रसिक, गुणग्राही राजकारणी अशी या व्यक्तिमत्वाची ही एक दुसरी पाकळी आणि साक्षेपी वाचक, ओजस्वी वक्ते, विचारवंत, समृध्द महाराष्ट्राचे शिल्पकार, सह्याद्रिचा प्रतिभा संपन्न भुमिपुत्र , मराठी मनाचा तुरा ही या व्यक्तिमत्वाची तिसरी पाकळी, अशा या पाकळयाचे बनलेले हे पुष्प. पंडितजींच्या नंतर त्यांच्या तुमानीवरील गुलाबी पुष्पांचा सुगंध भारतीय जनतेला देईल अशी आशा अनेक देशी- विदेशी मुत्सद्यांनी बाळगली होती. त्या सर्वांचे श्रेय यशवंतरावांनी आपल्यावर झालेल्या अनेक व्यक्तिंच्या श्रध्दा स्थानामुळे, राजकीय व्यक्तिंच्या जीवनातील चढउतारामुळे विचारवंत व्यक्तींच्या वैचारिकतेचा धांडोळा घेतल्यामुळे यशवंतराव या एका स्वतंत्र व्यक्तिमत्वाची जडण-घडण झाली. अशा सर्व व्यक्तींचे संस्कारही यशवंतरावांनी प्रमाण मानले.''[२७]

आज अशा संस्काराची समाजास, व्यक्तीस गरज आहे. सुसंस्कारातून व्यक्तीचे मन घडविणे आणि त्यास सर्व प्राणी मात्रांवर प्रेम करायला शिकविणे हा संस्काराचा निकष आहे. त्याचबरोबर समाजामध्ये ऐक्यभावना, बंधुता, मानवता, समता, प्रस्थापित करणे हेही संस्कारातून साध्य होते. यशवंतरावांच्यावर झालेले संस्कार त्यांच्या संस्कारक्षम व्यक्तिमत्वाचा बैठकीतून प्रत्ययास येते याची जाणीव त्यांच्या वैचारिकतेतून प्रकर्षाने जाणवते. संस्कारांने वैभवसंपन्न असे यशवंतराव त्यांच्या संपूर्ण

व्यक्तीमत्वातून जाणवतात. खऱ्या अर्थाने असा संस्कारसंपन्न नेता आजच्या राजकारणात पहायला मिळणे अशक्य आहे. माता, मातृभूमी आणि माती यांच्या संस्कारक्षम शक्तीवर ते महाराष्ट्राचे शिल्पकार ठरले. व्यक्ती, वाचन, लेखन, अनुभव यातून त्यांची जडणघडण झाली.

यशवंतरावांच्यावर आई आजी, मामा, बंधू, समाजातील आदर्श व्यक्ती, समाजातील घटक, सभोवतालचा परिसर, पुस्तके, साहित्यिक त्यांच्या आयुष्यातील प्रसंग यातून झालेल्या संस्कारातून, अनुभवातून त्यांचे व्यक्तिमत्व घडत गेले. या शिदोरीवर त्यांनी उत्तरार्धातील जीवन यशस्वी करण्याचा प्रयत्न केला. सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, सहकार, शेती, कृषी औद्योगिकता आणि समाजवादी समाजरचनेच्या क्षेत्रात त्यांनी जाणीवपूर्वक कार्य करून एक वेगळा ठसा उमटविला. संस्कारातून साकारलेले व्यक्तिमत्व समाजासाठी अविरत धडपडत राहिले. आजच्या तरूण पिढीस आदर्शवत असे हे यशवंतरावांचे व्यक्तीमत्व आहे. जीवनाच्या सर्व दालनातून त्यांनी आपल्या व्यक्तिमत्वाची चैतन्यभूक भागविली.

## यशवंतरावांच्यावर आदर्श व्यक्तींचा प्रभाव :-

यशवंतरावांनी जपलेली माणुसकीची नाती रक्ताच्या नात्याइतकीच मजबूत आणि खरीखुरी जिवंत नाती होती, यशवंतरावांच्या जडणघडणीमध्ये त्यांचे मित्रमंडळी, कार्यकर्ते, शाळेतील शिक्षक, चळवळीतील मंडळी, नेते, यांचाही मोलाचा वाटा आहे. यशवंतराव सार्वजनिक काम करीत असताना, कुटुंबात वावरत असताना, त्यांचा अनेक लोकांशी संबंध येत गेला आणि कळत-नकळत त्या व्यक्तीच्या विचारांचा, कृतींचा प्रभाव यशवंतरावांच्यावर पडत गेला. यशवंतराव शाळेमध्ये असताना त्यांच्या वाचनामध्ये म. फुले, टिळक, आगरकर यांचे जीवनचरित्र आले. यशवंतरावांच्या यशस्वी जीवनामध्ये या व्यक्तींना अनन्य साधारण महत्व आहे. त्यांच्या व्यक्तिमत्वाने यशवंतराव प्रभावित झाले म. फुल्यांचे विचार मूलगामी आणि दिशा देणारे आहेत हे यशवंतरावांच्या लक्षात आले. ग्रामीण समाज, शेतकरी, शेतकऱ्याची होणारी पिळवणूक, दलितांवर होणारा अन्याय आणि शिक्षणापासून वंचित ठेवलेला बहुजन समाज, स्त्रिया यांच्यावर होणारे अन्याय, अत्याचार त्यांचे प्रश्न सोडविल्याखेरीज देशाची प्रगती होणार नाही हे म. फुलेंनी मांडलेले विचार यशवंतरावांच्या मनावर बिंबले गेले.

या महान पुरूषाचा प्रभाव यशवंतरावांच्यावर पडत गेला. म. फुले आणि टिळक यांच्या दृष्टीकोणातील फरक यशवंतरावांना जाणवतो डॉ. आंबेडकर यांनी जोतिबांना गुरू मानले, म. गांधीजींनी यांना ' खरा महात्मा' म्हणून त्यांचा गौरव केला. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी 'सामाजिक क्रांतीकारक म्हणून त्यांचे जयगान केले त्यांनाच यशवंतरावांनीही अतिशय मोठा माणूस, समाजसुधारक' मानले आहे. शिक्षणातून समताधिष्ठित समाजनिर्मिती व्हावी हा म. फुलेंचा विचार यशवंतरावांच्या मनात रूजला गेला आणि त्यातूनच त्यांनी भविष्यात पावले उचलली.

नरकेसरी लोकमान्य टिळकांच्या विचारांनी यशवंतरावांचे मन संस्कारीत होत गेले. टिळकांच्या या विचारांनी प्रभावित झालेले यशवंतराव टिळकांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन आत्मसात करीत गेले. आपले सबंध जीवन सातत्यपूर्वक देशाच्या कामाकरीता द्यायचे हा त्यांनी घेतलेला निर्णय यशवंतरावांना रोमहर्षक स्वरूपाचा वाटला. स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे आणि तो मी मिळविणारच हा मंत्र त्यांनी फक्त उच्चारला नाही तर आयुष्यभर यासाठी आपले प्राण त्यांनी वेचले. जगाला स्वातंत्र्याची प्रेरणा देणारे टिळकांचे विधान यशवंतरावांना त्यांच्या व्यक्तिमत्वाचे लेणे वाटत आहे.'' वैयक्तिक जीवनामध्ये माणसाने कसे वागावे, संकटाशी जिद्दीने कसे लढावे इ. मार्गदर्शन त्यांच्या जीवनाकडे पाहिल्यानंतर आपणास मिळत असल्याचे यशवंतराव सांगतात.''[२८] संकटास कसे तोड द्यावे हे त्यांच्या व्यक्तिमत्वातून शिकण्यासारखे असल्याचे ते सांगतात. टिळकांचे वैयक्तिक गुण त्यांना अत्यंत मोलाचे वाटतात. या गुणांची रूजवणूक त्यांच्या व्यक्तिमत्वात होत गेली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार परंपरेचा वारसा यशवंतरावांनी जपला होता. ''कोणाचा जन्म कोठे व्हावा हे कोणाच्याच हाती नसते. आपल्या जीवनाचा जन्म पूर्व संदर्भ नियती ठरवित असते. जन्माबरोबरच येणाऱ्या उपाधी स्विकारून जीवनयात्रेला प्रारंभ करावा लागतो. काही व्यक्ती जीवनाच्या वाटेवरून निमूटपणे चालत राहतात. काही व्यक्ती चालता चालता थांबतात , विचार करतात मागे पुढे पाहतात. ही वाट आली कोठून? आणि जाणार कुठे? या जगात ही एकच वाट आहे का? ती अटळ आहे का ? असा विचार करणाऱ्या भेदक बुध्दीच्या माणसांपैकी डॉ. आंबेडकर हे एक होते.''[२९] बाबासाहेबांच्या सहवासात राहिल्यामुळे, राजकीय शिष्यत्व पत्करल्यामुळे, एका जातीचे ते नेते असल्यामुळे त्यांच्या विषयी आदर असणे स्वाभाविक आहे मात्र या पैकी कोणतेच नाते नसताना त्यांच्या विषयी आदर व्यक्त करणे हा माझा विशेष

अधिकार असल्याचे ते सांगतात. आंबेडकरांची तत्वप्रणाली, त्यांनी दिलेले आदेश विशिष्ट परिस्थितीतील त्यांचे वागणे, त्या वागण्यातून निर्माण होणारे दृष्टिकोन यामुळे आपणा सर्वांच्या पुढे जे प्रश्न निर्माण केले आहेत ते सोडविण्यासाठी त्यांच्या जीवनाकडे पाहण्याचा, मदत व मार्गदर्शन घेण्याचा माझा प्रयत्न अगदी विद्यार्थी म्हणून मी प्रयत्न करीत असतो.''[30] असे यशवंतराव सांगतात. यातूनच संस्काक्षम मनावर त्याचा प्रभाव पडत गेला.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर समानता, सामाजिक न्याय, आर्थिक न्याय निर्माण व्हावा या विचाराचे आंबेडकर दबलेल्या, पिचलेल्या दलित समाजाला नवजीवन देण्याचा प्रयत्न करण्यातच आयुष्याचे ते सार्थक मानतात. नवी सामाजिक परिस्थिती निर्माण करायची असेल तर सहनशीलता, आपुलकी, समजूतदारपणा आणि दुसऱ्याचा विचार समजून घेण्याची प्रवृत्ती इ. गुणांची वाढ आपण समाजात निर्माण केली पाहिजे. असे त्यांना वाटते. आंबेडकरांचा समानतावाद यशवंतरावांच्या मनावर बिंबला गेला.

शिवाजी महाराज हे यशवंतरावांचे श्रध्दास्थान होते, भक्तीपीठ होते. जनतेचा कल्याणकारी योजना त्यांच्या कार्याचा प्रमुख हेतू होता हाच हेतू यशवंतरावांनी ठेवलेला होता. शिवाजी महाराजांच्यावर अधिक भाष्य करताना ते म्हणतात - '' महाराजांच्या मूर्तीला आम्ही फक्त प्रतिमा मानीत नाहीत तर त्यातून आम्ही भारतीय तेजस्विता अनुभवतो, भारतीय अभिमान, भारताची अस्मिता, भारताचा स्वाभिमान या मुर्तीतून आम्हाला जाणवत असतो. स्वाभिमान, तेजस्विता अस्मिता या सर्व गुणांची ही मुर्ती म्हणजे प्रतिक आहे. अशी या मागची भावना आहे.''[31] त्यांचेच अनुकरण यशवंतरावांनी करण्याचा निश्चय करून भविष्यात वाटचाल केली. जनतेतील साधुता वाढावी हया तत्वाशी प्रतिज्ञाबध्द झालेले असे हे शल्य आणि म्हणून यापुढच्या कांही वर्षात दारिद्रय आणि अज्ञान यांच्याशी झगडा करून स्वाभिमानी, साधुत्वावर विश्वास ठेवणारा, नैतिक असा मराठी समाज या भूमीवर अवतरलेला त्यांना पाहावयाचा आहे. त्यासाठी आम्ही शपथ घेत असल्याचे ते सांगतात असा जुन्या प्रतिज्ञांचा नवा अर्थ यशवंतराव सांगतात. सुखाच्या वेळी एकत्र येणारी माणसे दु:खाच्या आणि प्रयत्नाच्या वेळी एकत्र येतील तर दुनियेमध्ये कधी कुणी न पाहिलेला पराक्रम करून दाखवतील असा विश्वास त्यांना वाटतो. माणसाच्या हृदयाला स्पर्श करणारे यशवंतराव आपल्या शब्दांनी लोकांना जिंकून घेतात. ती कला त्यांना साधली होती हे त्यांच्या उपरोक्त विधानातून आपणास कळून चुकेल. शिवाजी महाराजांना मानबिंदु मानणारे यशवंतराव

त्यांचे भक्त होते. शिवाजी महाराज हे त्यांचे भक्तीपीठ होते. त्यांच्या समोर राजांची आदर्श राज्य व्यवस्था होती. कारण शिवरायांनी गाजविलेले शौर्य, केलेले कर्तृत्व आणि राज्य स्थापना हे या मराठी मनाच्या यशवंतरावांवर बिंबत गेले.

मानवतेचे पुजारी महाकवी रविंद्रनाथ टागोर यांच्या थोर, उदात्त आणि सर्वस्पर्शी जीवनात यशवंतराव स्पर्श करतात. या थोर मानवाचे मन मोठे होते त्यामुळे यशवंतराव प्रभावित झाले. म.गांधी, पं. नेहरू, एम्. एन् . रॉय यांच्या राजकीय तत्वज्ञानाच्या लाटा त्यांच्या भावजीवनाला कशा ढवळून काढत होत्या ते सांगतात- ''गांधीच्या व्यक्मित्वावर निष्ठा, पंडित जवाहरलाल नेहरूंच्या विचारासंबंधी एक नवी जवळीक ... आणि मानवेंद्रनाथ रॉय यांच्या विचाराकडे पाहण्याचा दृष्टीकोन अशा या वैचारिक त्रिकोणात मी या वेळी उभा होतो.''[३२] असा वैचारिक संभ्रम यशवंतराव स्पष्ट करतात. अशा सर्व वातावरणातून विचारांतून यशवंतराव घडत होते.

यशवंतरावांच्या जडणघडणीमध्ये त्यांची आई 'विठाई' आणि पत्नी वेणूताई यांना अतिशय महत्वाचे स्थान आहे. कारण एक तर या दोन्ही व्यक्ती त्यांच्या जीवनाला आकार आणि आशय देणाऱ्या होत्या आणि दुसरे असे की, त्यांची व्यक्तिचित्रे लिहायची म्हणून स्वतंत्रपणे ठरवून न लिहिता सहज ओघात ती आलेली असल्यामुळेही ती अधिक हृदयस्पर्शी उतरली आहेत. यशवंतराव माता आणि मातीशी अतिशय एकरूप होऊन म्हणतात- '' तीर्थतुल्य मातेच्या दर्शनाने माझे अष्ट सात्विक भाव जागे होतात. अंतर्मन निथळू लागते. पौर्णिमेच्या चंद्रातून अमृतबिंदू ठिबकावेत, तशी तिची प्रेमळ दृष्टी माझ्यावर वर्षाव करते आणि नकळत पायगत झालेल्या पापण्या, हृदयाच्या चौफाळ्या वरील पावले धुंडाळू लागतात.''[३३] यातूनच आई विषयीच्या भावना लक्षात येतात. आपल्या पत्नीविषयी यशवंतराव म्हणतात- '' माझ्या निवडणुकीच्या यशानंतर मी माझ्या आईच्या पायाला स्पर्श करून नमस्कार केला. त्यानंतर अनेक महिलांनी येऊन मला ओवाळले. माझी पत्नी सौ. वेणूताई हिनेही येऊन मला ओवाळले. तेव्हा माझे डोळे पाणावले. मी तिलाच ऐकू जाईल असे सांगितले, 'वेणू बाई या यशात तुझाही वाटा आहे''[३४] असा पत्नीबाबतचा अभिमान ते व्यक्त करतात. नव्या संसाराची स्वप्ने रंगविण्याच्या वयात तिला तुरूंगाची हवा चाखावी लागली. याचे दु:खही यशवंतरावांना वाटले. आई आणि पत्नी यांचे सान्निध्य ही यशवंतरावांची प्रेरणा ठरली.

यशवंतरावांची मित्रमंडळी, शिक्षकवर्ग, सहकारी, राजकीय पुढारी या समकालीनांचाही प्रभाव पडला. त्याचबरोबर लेखक, कलावंत यांचाही प्रभाव दीर्घकाळ

पडल्याचे निदर्शनात येते. रावसाहेब पटवर्धन, आचार्य भागवत, राघूअण्णा लिमये, जतिंद्रनाथ तसेच ना. सी. फडके, खांडेकर, कवी यशवंत, बहिणाबाई, संत ज्ञानेश्वर, तुकाराम अशा थोर विभूतींनी मानवतेचे संस्कार त्यांच्यावर केल्याचे सांगतात. त्यांच्या गुणकार्याची, शक्तीची, मानवतेची ते पुजा करतात. अशी यशवंतरावांची जडणघडण संपूर्ण समाज, परिस्थिती, व्यक्ती, घटना, प्रसंग, अनुभव त्याचबरोबर राज्यातील, देशातील घडोमोडी यातूनच होत गेल्याचे लक्षात येते. या व्यक्तीमत्वांचा आलेख रेखाटताना दिसते की ते थोर देशभक्त रसिक व्यक्तिमत्व, धुरंधर मुत्सद्दी, विचारवंत, गुणग्राही, सौजन्यमूर्ति, व्यवहारी राजकारणी, दिलदार मित्र व लोकांच्या प्रेमात गुरफटलेला हा नेता होता. यशवंतरावांनी आपल्यावर झालेल्या अनेक व्यक्तींच्या श्रध्दास्थानामुळे, राजकीय व्यक्तीच्या जीवनातील चढउतारामुळे विचारवंत व्यक्तींच्या वैचारिकतेचा धांडोळा घेतल्यामुळे यशवंतरावांच्या व्यक्तिमत्वाची एक स्वतंत्र जडण-घडण झाली. अशा सर्व व्यक्तींचे संस्कारही यशवंतरावांनी प्रमाण मानले. '' मी यशवंतराव होणार'' हे सिध्द करून आपल्या स्वतंत्र व्यक्तिमत्वाच्या वाटचालीला अनेक हितचिंतक आणि मित्रांचे पाठबळ कसे लाभले यालाही यशवंतरावांनी मानाचे स्थान दिले आहे. यातूनच अतिशय संस्कारक्षम अशा यशवंतरावांच्या व्यक्तिमत्वाची वैचारिकता विकासित झाल्याचे दिसून येते. बालपणापासूनच सभोवतालच्या परिस्थितीचे अवलोकन करीत त्याच्याशी मिळते जुळते घेत सतत पुढे जाण्याचा त्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केलेला दिसतो. या सर्व घडामोडीत क्रांतीकारक जतिंद्रनाथानी देशासाठी प्राण दिला या घटनेने यशवंतरावांच्या मनावर खोलवर परिणाम झाला यातूनच त्यांचा राजकीय पिंड साकारला गेला. या सर्व बाबींतून त्यांचा विशाल मानवतावादी घडत गेला.

यशवंतराव चव्हाण ही केवळ व्यक्ती नव्हती तर तो एक विचार होता. महाराष्ट्राचे शिल्पकार व आखिल भारतीय कीर्तीचे राजकीय नेते यशवंतराव त्यांच्या संबंधी थोडक्यात बोलायचे झाले तर असे म्हणता येईल -

'' प्रज्ञा आणि प्रतिभा विवेक आणि विचार संयम आणि सहिष्णुता, मर्दुमकी आणि मुत्सदेगिरी या गुणांनी मंडित असं हे व्यक्तिमत्व होतं . ही नुसती व्यक्ती नाही. ती एक शक्ती आहे. नुसती शक्ती नाही तर तो एक विचार आहे. नुसता विचारही नाही. ती एक विचारधारा आहे, नुसती विचारधारा नाही तर तो एक आचार आहे. किंबहुना आचार संहिता आहे. या व्यक्तीत, या शक्तीत, या विचारात, या आचारात, या विचारधारेत

आणि आचार संहितेत महाराष्ट्राचं आणि भारताचं महन्मंगल करण्याचं प्रचंड सामर्थ्य साठविलेलं होतं'' असे मला वाटते.

## यशवंतराव चव्हाणांच्या साहित्याचा परिचय :-

यशवंतरावांना लहानपणापासून साहित्याविषयी प्रेम असल्याचे दिसून येते. संस्कारक्षम मन नियतीने त्यांना दिले आणि त्याच नियतीने उत्तम संस्कार करणारी माणसं आणि परिस्थिती यशवंतरावांच्या सभोवती निर्माण करून त्यांच्या मनाला घडविलं. त्यामुळे एक राजकारणातून, समाजकारण करणारा नेता म्हणून यशवंतरावांची प्रतिमा आपल्या मनासमोर उभी राहिली तरी त्यांच्या अंतरात सतत तेवणारी संस्काराज्योती मधून मधून प्रसंगोपात प्रकाशाची किरणं दाखविते . आणि त्या प्रकाशात यशवंतराव म्हणून एक सुशिक्षित, संस्कारसंपन्न साहित्यिकांचा बाज असलेला संवेदनाक्षम मनाचा माणूस असल्याचं प्रत्ययाला येतं. मानवी जीवन आणि साहित्य यांचा अतिशय जवळचा संबंध आहे. मानवी जीवनाचे, समाजाचे प्रतिबिंबच साहित्यात उमटत असते. मानवी मनाच्या घडणीमध्ये साहित्याचा महत्वाचा वाटा असतो. कारण साहित्य निर्मिती करणारा लेखक एक माणूसच असतो. तो समाजाचा महत्वपूर्ण घटक आहे. यशवंतरावांच्या मन:पिंडावर उत्तम, सकस साहित्याचे संस्कार झाले होते. त्यांचे साहित्यविषयक चिंतन सखोल आणि मर्मस्पर्शी होते. म.फुले, आगरकर, पं. नेहरू आणि डॉ. आंबेडकर यांचे वैचारिक साहित्य त्यांच्या व्यक्तीमत्वाच्या उभारणीला निश्चितच सहाय्यक झाले.

यशवंतरावांना प्रतिभेचे देणे आईकडून उपजतच मिळाले होते. दळताना आईने म्हटलेल्या स्वरचित ओव्यानी पहिला वाङ्मयीन संस्कार त्यांच्यावर केला. त्यांची आई मंदिरात रामायण- महाभारत कथा ऐकण्यास घेऊन जात असे. स्वत: आईनेही रामायण - महाभारताचे कथासार असणाऱ्या बऱ्याच ओव्या रचल्या होत्या. आईबरोबर ऐकलेली कथा - कीर्तने, प्रवचने व पौराणिक आख्याने इत्यादीतून त्यांचे भाषाभान सतर्क झाले होते. बालपणापासूनच त्यांना वाचनाचा छंद होता. जे सापडेल ते वाचावे यातूनच त्यांना साहित्याची गोडी लागली. त्या बरोबर देवराष्ट्रे हे यशवंतरावांचे आजोळ आहे. त्याच्या शेजारील सागरोबाचे मंदिर, रम्य परिसर, पाण्याची कुंडे, संपूर्ण शिवार याचा त्यांना लळा लागला होता. सोनहिऱ्याच्या ओढयाच्या काठावर, घनगर्द आंबराईत कोकिळेच्या कुहुकुहू स्वरात स्वर मिसळून त्यांनी अर्धेअधिक मेघदूत मुखोद्गत केले

होते. तेथील डोंगर, झाडे, उन्या खोऱ्यातून बालवयातच साहित्यिकाची निकोप जडणघडण होत गेली.

यशवंतरावांचे चौफेर वाचन असल्यामुळे त्यांच्या विचारांना एक वैचारिक पाया होता.शालेय जीवनापासून अनेक पुस्तके वाचण्यास सुरूवात केलेली होती. यशवंतरावांनी अनेक अक्षर वाङ्मय वाचल्यामुळे त्यांना साहित्याची रूची निर्माण झाली. यातूनच समाज, समाजातील व्यक्ती, प्रसंग, अनुभव, निसर्ग यावरूनच त्यांनी 'ललित लेखन' केले. जीवनातील विविध चिंतन व त्या चिंतनाच्या अनुषंगाने प्रत्यक्ष अनुभव जसे येतील तसेच साहित्यात उतरविण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. लघुनिबंध, ललित निबंध, प्रसंगचित्रे, व्यक्तिचित्रे, भाषाचित्रे, प्रवास वर्णने, वैचारिक लेख इ. प्रकारांतून त्यांनी मनातील भावना, विचार लिखित स्वरूपात उतरविण्याचा हा एक प्रयत्न केलेला आहे.

यशवंतरावांचे साहित्य क्षेत्रातील योगदान सामान्य नाही. वाचनाची प्रचंड आवड, मनन, चिंतन यातून त्यांची स्वतःची वैचारिक दृष्टी निर्माण झाली. यालाच प्रतिभेची जोड देऊन यशवंतरावांचे लेखन आकारास येऊ लागले. वाचनातून, अनुभवातून, सभोवतालच्या परिस्थितीतून त्यांचे वाङ्मयीन भाषाज्ञान सतर्क बनले. साहित्य आणि साहित्यिक याबाबत त्यांच्या मनामध्ये आदर होता. स्वत: ते साहित्यिक होते. इंग्रजी, हिंदी, मराठी, उर्दू अशा अनेक भाषांतील साहित्य ते वाचत असत. महत्वाचे असे की, त्यांचे स्वतःचे ग्रंथालय होते. आज तेच ग्रंथालय 'वेणूताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट,कराड' मध्ये पहायला मिळते. आज तेथे एकूण ६५८५ ग्रंथ आहेत. यातील निम्म्याहून अधिक म्हणजे ३९३४ पुस्तके त्यांनी स्वत: विकत घेतलेली आहेत.तर २,६५१ पुस्तके त्यांना भेट म्हणून लेखकमित्र, प्रकाशक, विविध संस्था यांच्या कडून प्रसंगानुरूप मिळालेली आहेत. यातील बरीचशी पुस्तके त्यांनी अभ्यासली आहेत. परंतु वेळे अभावी त्यांना काही पुस्तके वाचता आली नाहीत याची यशवंतरावांना खंत वाटते. यावरूनच यशवंतरावांची साहित्याशी मैत्री किती निकटची होती हे प्रत्ययास येते.

यशवंतरावांनी ललितलेख, वाङ्मयीन समीक्षा, व्यक्तिचित्रे, प्रवासवर्णन, वाङ्मयीन रसग्रहण, पत्रात्मक लेखन व आत्मचरित्र अशा अनेक वाङ्मयप्रकारामध्ये लेखन केलेले आहे. 'कृष्णाकाठ' हे त्यांचे आत्मचरित्र, 'ऋणानुबंध' हा आत्मविश्लेषणात्मक ग्रंथ. 'भूमिका', 'शिवनेरीच्या नौबती', 'युगांतर', 'सह्याद्रीचे वारे', 'शब्दाचे सामर्थ्य' हे भाषण संग्रह, विदेश दर्शन हे प्रवास वर्णनपर पुस्तक

यासारख्या कलाकृतींनी मराठी साहित्य जगतात यशवंतरावांचे वेगळेपण ठळकपणे दाखवून दिले. यशवंतरावांनी अनेक पुस्तकांना प्रस्तावना लिहून एक प्रकारची त्या पुस्तकाची समीक्षाच केली असे जाणवते. विविध वाङ्मय प्रकार हाताळणारे यशवंतराव उत्तम कलावंत व उत्तम समीक्षक होते.

यशवंतरावांनी साहित्यातून स्वानुभव, विविध व्यक्ती, समाज, राष्ट्रीय ऐक्यभाव, सामाजिक समता, अस्पृश्यता, जातीभेद, साहित्य शिक्षण, संस्कृती, कृषीक्षेत्र इ. संबंधीचे विचार मांडल्याचे दिसून येते. यशवंतरावांचे साहित्य हे जीवनवादी, समाजवादी आणि राजकीय स्वरूपाच्या प्रवाहातून जात असताना त्यामध्ये सांस्कृतिकताही डोकावते. एक एक वाक्य हा एक विचार बनतो. ते विचारधन अतिशय मौलिक स्वरूाचे तर आहेच पण जीवनास मार्गदर्शक ही ठरते. समाजप्रबोधन हा त्यांच्या साहित्याचा मुख्य हेतू होता. मानवी जीवनातील प्रत्येक अंगावर साहित्यातून प्रकाश टाकला पाहिजे. साहित्याची अंतिम प्रेरणा ही मानवी मूल्यांची जाणीव करून देणारी असावी, त्यातून सामाजिक एकता आणि भारतीयत्वाचा शोध घ्यावा असे यशवंतरावांना वाटते.

'कृष्णाकाठ' हे यशवंतरावांचे आत्मचरित्र होय. आपण कसे घडलो? आपले जीवन कसे वाढले? याचे दर्शन यातून घडते. जन्मापासून ते १९४३ पर्यंतच्या जीवनातील घडामोडी या आत्मचरित्रामध्ये त्यांनी कथन केलेल्या आहेत. आत्मचरित्राचा हा पहिला खंड आहे.यशवंतरावांचा हा जीवनपट त्यांच्या आयुष्यातील घडलेल्या घटनांची कालानुक्रमे नोंद करणारा आहे. 'कृष्णाकाठ' वाचल्यानंतर त्यांच्या अथांग जीवनसागरात डुंबल्याचा आनंद मनास वाटतो. जीवनातील चढ उतारांचा हा आलेख म्हणजे जीवनांतील घटनांचा, अनुभवांचा गुणाकार, भागाकार व बेरीज वजाबाकी असते. शेवटी बाकी राहते ती सत्याची, विश्वसनीयतेची होय.

आत्मचरित्राची भाषा अतिशय साधी, सोपी, प्रवाही पण अर्थपूर्ण अशी आहे. वाङ्मयीनदृष्टया 'कृष्णाकाठ'चे लेखन अतिशय सरस ठरते. वैचारिक व भावनात्मक वातावरणातून लेखकाचे व्यक्तिमत्व कसे बनते याचा प्रत्यय आत्मचरित्रातून येतो. महाराष्ट्रात वेळोवेळी निर्माण झालेल्या वैचारिक आंदोलनाचा, सामाजिक सुधारणांचा, चळवळींचा, स्वातंत्र्य लढ्याचा यातून स्वत:ची मानसिक, भावनिक जडण-घडण कशी होत गेली यामध्ये घर, कुटुंब, समाज या घटकांतील व्यक्तिंचा कसा सुसंस्कार होत गेला याचे वास्तवदर्शी दर्शन या आत्मचरित्रातून घडत असताना आजच्या तरूण पिढीला आणि राजकारणी व्यक्तींना मार्गदर्शनही यातून घडते. लालित्याची भाषा आणि

वाङ्मयीन सौंदर्य यांचा संगम झालेले 'कृष्णाकाठ' हे आत्मचरित्र अतिशय संयमी, सर्जनशीलतेचे प्रतिक ठरते.ते महाराष्ट्राचे जीवनभाष्य आहे. 'माणूस'म्हणून जे व्यक्तिमत्व घडले त्याचा आलेख म्हणजे 'कृष्णाकाठ' होय.

'ऋणानुबंध' हे एक यशवंतरावांचे आत्मगत आहे. यामधील प्रत्येक ललित लेख लालित्याची डूब देणारा ठरतो. वेगवेगळ्या प्रसंगी घडणाऱ्या घटना, मानसिक आंदोलने, आवडीचे छंद, वेगवेगळी भेटणारी माणसे, त्यांचे स्वभाव, त्यातून मिळणारे अनुभव, विचार, कल्पना, आठवणी यांचा संगम या ऋणानुबंधात झालेला आहे. बालपणापासून घडलेल्या मनोवेधक प्रसंगाचे चित्रण आठवणी रूपातून यशवंतरावांनी मांडलेले आहेत. वास्तवतेतून सामाजिकतेचे भान जपणारे यशवंतराव आपल्या जीवनातील येणाऱ्या प्रसंगातून उभे राहताना दिसतात. वाङ्मयीनदृष्टया श्रेष्ठ दर्जाचे लेखन करणाऱ्या लेखकाने अतिशय कसदार, दमदार लेखन निर्माण केले. समाजातील सूक्ष्म निरीक्षण, सूक्ष्म तपशील, घडामोडी आणि त्यातून बनलेले सुसंस्कारित मन उभे राहते. आत्मचिंतनपर शब्द, विचार, भाषा यातून लेखन समृध्द केल्याचे या कलाकृतीतून दिसून येते.नवनव्या जाणीवांच्या शोधातून आत्मनिष्ठ स्वरूपाचे लेखन त्यांनी केले आहे. यशवंतरावांच्या मनाचा मागोवा, अनुभवाचा मागोवा त्यांच्या या 'ऋणानुबंध' या ग्रंथातून दिसून येतो.

'शिवनेरीच्या नौबती', 'भूमिका', 'सह्याद्रीचे वारे', 'युगांतर', 'शब्दाचे सामर्थ्य' हे भाषण संग्रह म्हणजे उत्कृष्ट ललित निबंध प्रकाराचा आविष्कार होय. विचार आणि वाङ्मय, तत्त्वज्ञान आणि प्रतिभा यांचा सुंदर मिलाप झालेली त्यांची भाषणे आजच्या समाजास, राजकारणास, शिक्षण क्षेत्रास, अर्थकारणास, कृषी क्षेत्रास, साहित्यिकांस अत्यंत मोलाचे मार्गदर्शक ठरणारी आहेत. यशवंतरावांचे मौलिक 'विचारधन' आजच्या तरूण पिढीला मार्गदर्शक'खजिना' आहे. ध्येयवादी वृत्तीचे यशवंतराव समाजात वावरत असताना खोलवर मनन, चिंतन करतात आणि अनुभवातून भविष्याचा वेध घेण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या विचारांतून राष्ट्राची उभारणी करण्याचा त्यांचा मनोदय या ललित निबंधातून जाणवतो.

'वक्तां दशसहेस्त्रेषु' या उक्तीनुसार यशवंतराव उत्तम वक्ते होते. 'सभा जिंकणारा वक्ता' म्हणून त्यांची ख्याती होती. वक्तृत्वातून प्रभावी नेतृत्व आणि नेतृत्वातून उत्तुंग कार्यकर्तृत्व यांचा त्रिवेणी संगम म्हणजे यशवंतराव होय. स्वयंतेजाने, प्रेरणेने झळकणारे हे व्यक्तिमत्व भाषणांतून वेगवेगळ्या विषयांवर सखोल ज्ञान मांडणारे होते. विचाराची

मुद्देसुद बांधणी करणारे होते.मीतभाषीय असणारे यशवंतराव नावाप्रमाणेच यशाचा मार्ग दाखवितात. यशवंतरावांच्या भाषणामध्ये फक्त शब्दांची जुळवाजुळव नाही तर त्यातून 'विचार' आहेत.विविध विषयांना स्पर्श करणारी यशवंतरावांची भाषणे जनसमुदायाला मंत्रमुग्ध करत.

'विदेश दर्शन' या पुस्तकामध्ये यशवंतराव जेव्हा मंत्री होते तेव्हाच्या देश-परदेशातील दौऱ्यातून त्यांची पत्नी वेणूताई यांना जी पत्रे पाठविली त्या पत्रांचे संकलन आहे. रामभाऊ जोशींनी ही पत्रे संपादित केली. राजकीय धकाधकीच्या व्यापात असताना देखिल यशवंतरावांनी आपल्या दौऱ्यामध्ये असताना सौंदर्यस्थळे, तेथील समाजजीवन, निसर्गसौंदर्य, कला, रूढी, चालीरीती, स्वत:ला आलेले अनुभव, वेगवेगळे प्रसंग, भेटी, घटना आणि वेगवेगळी माणसे, त्यांचा अनुभव यांच्या नोंदी 'विदेशदर्शन' मध्ये केलेल्या आहेत. जो निसर्ग पाहिला, रमणीय वाटला, मन प्रसन्न झाले आणि त्यातून काय वाटले हे यशवंतराव चित्रित करतात. परदेश दौऱ्यामध्ये ज्या मोठमोठ्या व्यक्ती भेटल्या त्य बरोबरीने वागल्या, त्यांचे स्नेहाचे नाते जुळले, त्यांच्या वृत्तीप्रवृत्ती समजल्या त्यांचेही दर्शन यातून घडते. त्या त्या वेळचे हे विचारमंथन लालित्यपूर्ण शैलीने नटलेले आहे. प्रवासाची गोडी आणि त्यातील आस्वादिक आनंद ते अतिशय तटस्थपणे , गंभीरपणे आणि भावपूर्ण शब्दात मांडतात.वाङ्मयीन मूल्यांनी 'विदेशदर्शन' नटलेले तर आहेच शिवाय त्यांना ललित निबंधाचा दर्जाही प्राप्त झालेला आहे. प्रवासवर्णन हा ललित साहित्याचा एक वेगळा प्रकार आहे. या प्रवासवर्णनपर ग्रंथातून अतिशय मिस्किलपणे अन् तटस्थवृत्तीने त्यांनी स्वानुभव सांगितले आहेत. आशिया, आफ्रिका, युरोप, अमेरिका इतर छोटे-मोठे देश यांना दिलेल्या भेटी, स्थळे, प्रसंग यांच्या नोंदी 'विदेशदर्शन' या पत्रसंग्रहातून दिसतात.

यशवंतरावांनी अनेक साहित्यिकांच्या साहित्यकृतींना प्रस्तावना लिहिल्या आहेत. साहित्यसमीक्षक दृष्टीने यांनी वेगवेगळ्या भाषेतील ग्रंथांना मूल्यमापनात्मक प्रस्तावना लिहिताना त्या साहित्याचे अंतरंग उलगडून दाखविण्याचा छानसा प्रयत्न केलेला आहे. अतिशय आटोपशीर पण विचारांचा वारसा देणाऱ्या प्रस्तावना या त्या त्या लेखन साहित्याचे मुखपृष्ठच ठरले. अनेक साहित्यावर त्यांनी अभिप्रायही लिहिले आहेत. त्याचबरोबर म. गांधी, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन, छ. शिवाजी महाराज, लो. टिळक, रविंद्रनाथ टागोर, बाबासाहेब आंबेडकर, छ. शाहू महाराज, काकासाहेब गाडगीळ यांच्यावर अतिशय चिंतनशील वृत्तीने विचारपूर्वक लेखन केलेले आहे. अनेक

प्रकाशक, लेखक, समाजसुधारक, नाटककार नेते यांच्यावरही आंतरिक जिव्हाळ्याने ते लिहितात.

वाङ्‌मयीन लेखनाबरोबरच नाट्य, संगीत, कला यांची आवड त्यांना होती.काव्य, कलाकार यांच्यावर ते मनापासून प्रेम करत असत. गोविंदाग्रज हे त्यांचे आवडते कवी होते. त्यांच्या कवितांचे त्यांनी मनापासून वाचन, मनन केले. अनेक साहित्यिकांना त्यांनी मानाची पदे दिली. आपुलकीने त्यांना मानाचे स्थान दिले.साहित्यावर प्रेम करणारा हा साहित्यिक खऱ्या अर्थाने प्रतिभावंत होता.या साहित्यकारावर अनेक राजकीय कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते, प्राध्यापक, शिक्षक, विद्‌वान पंडीत, व्यापारी, उद्योगपती, विविध पक्षातील कार्यकर्ते, स्वातंत्र्यसैनिक अशा विविध व्यक्तींनी लेखन करून त्यांच्या विविधांगी व्यक्तिमत्वाचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न केलेला आहे. व त्याचबरोबर गौरवांक विशेषांक, स्मरणिका, अभिनंदनपर, प्रशस्तीपर लेखन, यशवंतरावांवरील लोभापोटी अनेकांनी लिहिलेले, संपादित केलेले ग्रंथ, नियतकालिके, मासिके इ. मध्ये यशवंतरावांसंबंधी लेखन मान्यवरांनी केले आहे. यातून यशवंतरावांचे आगळे-वेगळे व्यक्तिमत्व समाजासमोर येण्यास मदत झालेली आहे.

थोडक्यात यशवंतराव हे राजकारणाच्या क्षेत्रात नसते तर जागतिक किर्तीचे उत्तम साहित्यिक झाले असते. त्यांच्या समग्र साहित्य वाचनातून व्यासंगी, सुसंस्कृत व्यक्तिमत्व लोकशाही जीवनाचे मर्म समजलेले, संवेदनशील आणि विशाल मानवतावादी दृष्टीचे असल्याचे प्रत्ययास येते. या संदर्भात लेखक विठ्ठलराव पाटील म्हणतात, ''यशवंतराव चव्हाण यांचे अभिजात ग्रंथप्रेम, त्यांचा विपुल ग्रंथसंग्रह, चौफेर वाचन, सुजाण रसिकता इ. सर्व ते अपूर्वाईचे. यांत खंत एवढीच की या प्रतिभावंत चंद्राचे उदंड चांदणे बरसलेले ते मुख्यत: समाजकारण, राजकारण या प्रदेशावर.जर हा चंद्र पौर्णिमेच्या पूर्ण प्रकाशात शारदेच्या दरबारात फुलला असता तर हे साहित्याचे वारे, युगांतर घडवत, ऋणानुबंध जोडत, कृष्णाकाठ उजळत सागरतीरावरून यमुनाकाठच्या दिशेने झेपावत राहिले असते.''[३५] असे हे अभिजात रसिक साहित्यिक अतिशय सर्जनशील, प्रतिभावंत, शब्दशक्तीच्या समर्थ किमयेच्या क्षमतेचे परिपूर्ण भान असलेले होते. वाङ्‌मयात प्रवीण आणि उदंड व्यासंग, साहित्याबद्दलची चोखंदळ जाण आणि साहित्य व समाज यांच्यातील एकमेकांच्या नात्याचे यथार्थ भान, चौरस अनुभवसंपन्नता

आणि आस्वादक समीक्षाबुध्दी इ. दुर्मिळ गुणांचा समूह यशवंतरावांच्या व्यक्तिमत्वात होता.

समारोप :-

यशवंतरावांच्या जडणघडणीमध्ये संस्कारसंपन्न व्क्ती, त्यांचे विचार, कृती तसेच सभोवतालचे वातावरण आणि वाचनसंस्कृती यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांच्या आयुष्यामध्ये जीवन जगत असताना आलेले अनुभव, विविध घडामोडी त्यांच्या पुढील जीवनप्रवासात नावाड्याप्रमाणे वाट दाखविणाऱ्या ठरल्या. समाजात वावरत असताना त्यांना अनेक अनुभव आले यातून त्यांचे सामाजिक मन तयार झाले. म्हणूनच महाराष्ट्राच्याच नव्हे तर देशाच्याही राजकारणात मानाचे स्थान मिळविणाऱ्या यशवंतरावांनी आपल्या राजकीय जीवनात राजकारणातून समाजकारण केले म्हणूनच अशा समाजसेवकाची जडणघडण महत्वपूर्ण ठरते.

माता, मातृभाषा आणि मातृमूमी यांच्यावर जीवापाड प्रेम करणाऱ्या यशवंतरावांनी आयुष्यभर सामाजिक बांधिलकी जपली. समाजाची प्रगती साधणे हाच त्यांच्या राजकारणाचा महत्वाचा उद्देश असे. वैचारिक प्रगल्भता लाभलेले यशवंतराव यांनी समाजप्रबोधन करण्यासाठी भाषण, लेखन यातून समाज जागृती करण्याचा प्रयत्न केला. विविधांगी व्यक्तिमत्व असलेले यशवंतराव खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचे शिल्पकार ठरले. कुशल प्रशासक, व्यासंगी नेतृत्व असलेल्या यशवंतरावांचे व्यक्तिमत्व अष्टपैलू बनले.

यशवंतरावांच्या अशा थोर व्यक्तिमत्वाविषयी प्रा. केशव वसेकर म्हणतात - "आदर्श, अष्टपैलू, संस्कारित व सुसंस्कृत, चतुरस्त्र, कनवाळू, प्रागतिक विचारसरणीचे, जनसामान्यांविषयी आत्यंतिक ओढ असणारे, माणुसकीने ओथंबलेले, शुद्‌ध चारित्र्य असलेले, रसिकाग्रणी, लोकसंग्राहक, मराठी मातीचा गंध लागलेले, उदारमतवादी, अभ्यासू, कलेचे भोक्ते, समन्वय साधणारे व संवेदनशील असे विविधतेने नटलेले यशवंतरावांचे व्यक्तिमत्व होय."[३६]

प्रसिद्‌ध लेखिका माधवी देसाई यशवंतरावांच्याबाबत म्हणतात - "भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात भाग घेणारे , शेतकरी कुटुंबात जन्म घेतलेले, अत्यंत कष्टातून, ध्येयवादातून ज्यांचे उत्तुंग व्यक्तिमत्व घडले होते, महाराष्ट्राचे शिल्पकार असे ज्यांचे नांव महाराष्ट्राच्या इतिहासावर सुवर्णाक्षरांनी कोरले गेले आहे, आमच्यासारख्या अनेक

जणांचे जे श्रध्दास्थान होते. साहित्य, साहित्यिक यांच्या सहवासांत मनापासून रमणारे उत्तम वाचक असणारे साहेब....जीवनभर कणखरपणे वागले, हिमालयाच्या मदतीने धावून जाणारा सह्याद्री असे ज्यांचे उत्तुंग व्यक्तिमत्व.... असे साहेब.''[३७]

निर्मलकुमार फडकुले यशवंतरावांच्या व्यक्तिमत्वाबाबत म्हणतात - ''यशवंतराव राजकारणी होते पण माझ्या मते त्यांच्यातला साहित्यिक अधिक मोठा होता. आणि त्यांच्यातल्या साहित्यिकापेक्षा त्यांच्यातला 'माणूस' अधिक मोठा होता.''[३८]

भारताचे थोर सुपुत्र या लेखात प्रा. डॉ. गंगाधर पानतावणे म्हणतात, ''यशवंतरावांनी महाराष्ट्र घडविला आणि देशाला संजीवन नेतृत्व दिले. राजकीय पडझड झाली तेव्हा ते आडवाटेला उभे राहिले पण राजकीय सत्तेचा आग्रह धरला नाही. राजकारणात सौजन्य, सात्विकता हे शब्द अर्थहीन असतात. याचे त्यांना पुरते भान होते.पण तरीही त्यांनी शुचित्वाचेच राजकारण केले. यशाने ते मातले नाहीत आणि अपयशाने ते खचले नाहीत. कृष्णाकाठचा वारा प्यालेल्या या भारताच्या थोर सुपुत्राने माणसावर आणि माणसातील संवेदना आणि सोहार्दावर विलक्षण प्रेम केले. माणसाने जगायचे तरी कशासाठी? याचे यशवंतरावांचे उत्तर हेच होते.''[३९]

डॉ. शिवाजीराव चव्हाण त्यांच्याबाबत म्हणतात - ''आधुनिक भारताच्या उभारणीसाठी त्यांनी दिलेले योगदान म्हणजे मराठी मातीने त्यांना दाखविलेला मानवसेवेचा दीपस्तंभ होता. आजच्या दुभंगलेल्या भारतीय समाजव्यवस्थेला सांधण्यासाठी या दीपस्तंभाच्या प्रकाशात रस्ता सापडू शकेल असा विश्वास वाटतो.''[४०]

विविध विचारवंत, लेखक, मान्यवर व्यक्ती यांच्यावरील मतांवरून यशवंतरावांचे अलौकिक व्यक्तीमत्व दृष्टीसमोर उभे राहते. विचारातून, आचारातून कृती करणारे यशवंतराव खऱ्या अर्थाने अतिशय थोर व्यक्तिमत्व होते. आजच्या दिशाहिन राजकारणात आणि समाजकारणात या विचाराचा नेता शोधूनही सापडणार नाही. खरंच,'असा नेता या भूतलावर पुन्हा होणे नाही.' त्यांच्या जीवनाचा आलेख हा एका अथांग महासागरासारखा आहे. ज्याला या जीवनाचा परिसस्पर्श झाला त्यांचे सोने झाले. अतिशय प्रगाढ्य, व्यासंगी यशवंतरावांचे विचार आचार आजच्या पिढीला निश्चितच दिशा देणारे ठरतील असे मला वाटते.

संदर्भ टिपा :-


१. कृष्णाकाठ - यशवंतराव चव्हाण, प्रेस्टीज पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती, फेब्रुवारी १९८४, पृ.क्र. १३.

२. ऋणानुबंध - यशवंतराव चव्हाण, प्रेस्टीज प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, एप्रिल १९८६, पृ.क्र. ५०

३. तत्रैव - पृ.क्र. ३२

४. कृष्णाकाठ - यशवंतराव चव्हाण, प्रेस्टीज पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती, फेब्रुवारी १९८४, पृ.क्र. १३.

५. तत्रैव - पृ.क्र. १४

६. ऋणानुबंध - यशवंतराव चव्हाण, प्रेस्टीज प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, एप्रिल १९८६, पृ.क्र. ३७

७. तत्रैव - पृ.क्र. ३९

८. यशवंतराव चव्हाण : व्यक्ती आणि वाङ्मय, एस.एस. देशमुख, पी.एच्-डी प्रबंध, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, पृ.क्र. ३३

९. ऋणानुबंध - यशवंतराव चव्हाण, प्रेस्टीज प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, एप्रिल १९८६, पृ.क्र. ४३.

१०. कृष्णाकाठ - यशवंतराव चव्हाण, प्रेस्टीज पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती, फेब्रुवारी १९८४, पृ.क्र. ३४.

११. तत्रैव - पृ.क्र. ४५

१२. तत्रैव - पृ.क्र. ११

१३. तत्रैव - पृ.क्र. १२.

१४. तत्रैव - पृ.क्र. १२

१५. ऋणानुबंध - यशवंतराव चव्हाण, प्रेस्टीज प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, एप्रिल १९८६, पृ.क्र. ११.

१६. कृष्णाकाठ - यशवंतराव चव्हाण, प्रेस्टीज पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती, फेब्रुवारी १९८४, पृ.क्र. २३.

१७. तत्रैव - पृ.क्र. १५३.

१८. तत्रैव - पृ.क्र. १५३

१९. तत्रैव - पृ.क्र. १९७.

२०. कृष्णाकाठ - यशवंतराव चव्हाण, प्रेस्टीज पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती, फेब्रुवारी १९८४, पृ. क्र. २१९

२१. तत्रैव - पृ.क्र. २१९

२२. तत्रैव - पृ.क्र. १४१

२३. तत्रैव - पृ.क्र. ५१.

२४. ऋणानुबंध - यशवंतराव चव्हाण, प्रेस्टीज प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, एप्रिल १९८६, पृ.क्र. ६.

२५. तत्रैव - पृ.क्र. २१९-२०.

२६. जनामनातील यशवंतराव - डॉ.नागनाथ हेगे, पंद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, फेब्रुवारी २००२, पृ.क्र. १४.

२७. यशवंतराच चव्हाण विविधांगी व्यक्तिमत्व - विठ्ठलराव वि पाटील, प्रकाशक, दीपक वी. पाटील कराड, आवृत्ती दुसरी, ऑक्टोबर २००२, पृ.क्र. २८, २९.

२८. सह्याद्रीचे वारे एक अभ्यास - केशव बा. वसेकर, पवन प्रकाशन, परभणी, प्रथम आवृत्ती, पृ.क्र. ६८.

२९. दीपस्तंभ - प्राचार्य शिवाजीराव भोसले, अक्षरब्रह्म प्रकाशन पुणे, तृतीय आवृत्ती, फेब्रुवारी १९९८, पृ.क्र. ३५७.

३०. सह्याद्रीचे वारे - यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, तिसरी आवृत्ती, ऑगस्ट १९९२, पृ.क्र. २८१.

३१. तत्रैव - पृ.क्र. २५५

३२. कृष्णाकाठ - यशवंतराव चव्हाण, प्रेस्टीज पब्लिकेशन्स, पुणे, द्वितीय आवृत्ती, मार्च १९८७, पृ.क्र. १५८.

३३. तत्रैव - पृ.क्र. १२२.

३४. यशवंतराव चव्हाण : राजकारण आणि साहित्य, भा.ल. भोळे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९८५, पृ.क्र. १३९.

३५. यशवंतराच चव्हाण विविधांगी व्यक्तिमत्व - विठ्ठलराव वि पाटील, प्रकाशक, दीपक वी. पाटील कराड, आवृत्ती दुसरी, ऑक्टोबर २००२, पृ.क्र. ६३.

३६. यशवंत विचार अमृत - सी.डी. पवार, प्रमोद प्रकाशन, प्रथम आवृत्ती, मे २००२, पृ.क्र. ०४.

३७. हिमनगांचे वितळणे - (लेख - १) माधवी देसाई, दै.पुढारी, बहार, कोल्हापूर

पुरवणी, दि. २७ एप्रिल २००३, पृ.क्र. ०४

३८. जनामनातील यशवंतराव - डॉ.नागनाथ हेगे, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, फेब्रुवारी २००२, पृ.क्र. ५३.

३९. जनमनातील यशवंतराव - पृ.क्र. ४२.

४०. यशोदीप - डॉ. शिवाजीराव चव्हाण, सुशिपाज प्रकाशन, वाई, प्रथम आवृत्ती, ऑगस्ट २०००, पृ.क्र. ०८.

***